https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
संपादक

राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ६ वे अंक -२४९ मंगळवार दि.१९ मे २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४

Beed Daily Marathi Year-6th Issue-249 Tuesday, Dt.19 May 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# परळी वैजनाथ, भीमाशंकर, देहू सहा सहा तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी ९९३ कोटीचा निधी मंजूर !

## तीर्थक्षेत्र विकासकामे कालमर्यादेत पूर्ण करण्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांचे आदेश

मुंबई : प्रतिनिधी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी झालेल्या तीर्थक्षेत्र विकास आराखडा शिखर समितीच्या बैठकीत सहा तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी ९९३ कोटी ७२ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. यामुळे संबंधित तीर्थक्षेत्रांचा कायापालट होणार असून भाविक, पर्यटकांना चांगल्या सुविधा मिळणार आहेत. तीर्थक्षेत्र विकासकामे दर्जेदार आणि कालमर्यादेत पूर्ण करण्याचे तसेच तीर्थक्षेत्र विकास आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी बैठकीत दिले.

आजच्या बैठकीत पुणे जिल्ह्यातील श्री क्षेत्र भीमाशंकर आदर्श गाव विकासासाठी १७२ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. या विकास आराखड्याअंतर्गत अत्याधुनिक बस स्थानक आणि पार्किंग सुविधा करण्यात यावी. वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी विविध वळण रस्ते आणि रस्ते रुंदीकरणाची कामे हाती घेण्यात यावीत. सध्या २.७ मीटर रुंदी असलेले रस्ते ७ मीटरपर्यंत रुंद करावा. भक्त आणि पर्यटकांच्या सुविधांसाठी मंदिर परिसरात पादचारी मार्ग, कव्हर्ड कॉरिडॉर, फ्लोअरिंग आणि एम्फीथिएटर, २५७ केएलडी क्षमतेचा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प आदी योजना हाती घेण्याची सूचना फडणवीस यांनी बैठकीत केली.

संत तुकाराम महाराज जन्मस्थानाच्या संवर्धनासाठी ४१ कोटींची तरतूद

संत तुकाराम महाराज यांचे देहू येथील जन्मस्थान, वैकुंठगमन मंदिर परिसर तसेच भंडारा डोंगर परिसराच्या संवर्धन आणि विकासासाठी ४१ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये रस्त्यांचे सुशोभीकरण, स्वच्छता व्यवस्था, पिण्याच्या पाण्याच्या सुविधा, पार्किंग व्यवस्था, भाविकांसाठी निवास सुविधा तसेच माहिती



केंद्र उभारणे, भंडारा डोंगर परिसरात हरित क्षेत्र संवर्धन, वृक्षारोपण आणि नैसर्गिक सौंदर्य अबाधित ठेवण्यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात, असे निर्देश फडणवीस यांनी दिले.

किल्ले अजिंक्यतारासाठी १३४ कोटी

सातारा जिल्ह्यातील ऐतिहासिक किल्ले अजिंक्यताराचे

पान २ वर...

### श्री क्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग मंदिर परिसरासाठी ३०१.५४ कोटींची तरतूद


श्री क्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग मंदिर परिसर मूळ आराखड्यातील पुढील नवीन कामांसाठी सुमारे ३०१.५४ कोटी रुपयांचा अतिरिक्त आराखडाही तयार करण्यात आला आहे. तीन टप्प्यात या मंदिराची कामे वेळेत पूर्ण करावीत. पहिल्या टप्प्यात प्रवेशद्वारे, डिजिटल रांग व्यवस्था, प्रतीक्षागृहे, अन्नछत्र, योग-ध्यान केंद्र आणि मंदिर परिसराचे सौंदर्यीकरण तर दुस-या टप्प्यात हरिहर आणि मार्कंडेय तीर्थांचे वैज्ञानिक पुनरुज्जीवन, घाट, सायकल ट्रॅक, दिव्यांगसुलभ सुविधा, फूड कोर्ट आणि सीसीटीव्ही सुरक्षा व्यवस्था उभारणे तर तिस-या टप्प्यात मेरू पर्वतावर भव्य शिवमूर्ती, शिवपुराण आणि वैदिक संग्रहालय, ॲम्फीथिएटर, लेझर लाईट अँड साऊंड शो आणि ध्यानस्थळे विकसित करण्याची सूचना फडणवीस यांनी केली. सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार,वनमंत्री गणेश नाईक, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले,आमदार दिलीप वळसे पाटील, धनंजय मुंडे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल आदी उपस्थित होते.

# स्थानिक स्वराज्य संस्थेच्या १६ जागांची निवडणूक जाहीर

## विधान परिषदेसाठी १८ जूनला मतदान, २२ जून निकाल

मुंबई : प्रतिनिधी

कोरोना आणि ओबीसी आरक्षणाच्या पेचामुळे लांबणीवर पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका व त्यामुळे रखडलेल्या विधान परिषदेच्या १६ स्थानिक स्वराज्य प्राधिकारी मतदारसंघाच्या निवडणुकीला अखेर मुहूर्त लागला आहे. निवडणूक आयोगाने या जागांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला. या निवडणुकीसाठी १८ जून रोजी मतदान होणार असून २२ जून रोजी निवडणुकीची मतमोजणी होऊन निकाल जाहीर केले जातील. या निवडणुकीसोबत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या नागपूरच्या जागेसाठी पोटनिवडणूक होणार आहे.



निवडणूक आयोगाने सोमवारी विधान परिषदेच्या १६ जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला. त्याचवेळी नागपूर स्थानिक स्वराज्य प्राधिकारी मतदारसंघासाठी पोटनिवडणूक घेण्याचे आयोगाने घोषित केले आहे. त्यामुळे नागपूर पोटनिवडणुकीसह एकूण १७ जागांसाठी एकाचवेळी मतदान होईल. निवडणूक होऊ घातलेल्या मतदारसंघातील जागा १ जानेवारी २०२२ ते २९ ऑगस्ट २०२५ या दरम्यान रिक्त झाल्या होत्या. कोरोनाचे संकट, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील इतर मागासवर्गाचे आरक्षण यामुळे प्राधिकारी मतदारसंघाची मुदत संपूनही त्यांच्या निवडणुका झालेल्या नव्हत्या. आता राज्यातील बहुतांश स्थानिक निवडणुका पार पडल्या आहेत.

निवडणूक होऊ घातलेल्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघात ७५ टक्के किंवा त्यापेक्षा जास्त मतदार आहेत. यासंदर्भात राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने

पान २ वर...

# सर्वसामान्यांना ४२० व्होल्टचा झटका! फॅन-लाईट तर सोडाच

## घर कायमचं बंद असलं तरी भरावं लागणार वीज बिल, 'हा' प्रस्ताव लागू झाला तर खिशाला भुर्दंड

मुंबई : पेट्रोल, डिझेल आणि सीएनजीच्या वाढत्या दरांमुळे आधीच सर्वसामान्यांचं बजेट कोलमडलं असताना आता वीज बिलाबाबतही मोठा आर्थिक झटका बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. केंद्रीय विद्युत प्राधिकरणाने वीज बिलातील फिक्स्ड चार्ज वाढवण्याचा प्रस्ताव मांडला आहे. हा प्रस्ताव मंजूर झाल्यास वीज वापर कमी असला किंवा घर पूर्णपणे बंद असले तरी ग्राहकांना दर महिन्याला ठराविक रक्कम भरावी लागू शकते.

सध्या वीज बिलामध्ये दोन प्रकारचं शुल्क आकारलं जातं. पहिले म्हणजे प्रत्यक्ष वापरलेल्या वीज युनिट्सचे शुल्क आणि दुसरे म्हणजे फिक्स्ड चार्ज. हा फिक्स्ड चार्ज वीज वापर कमी-जास्त



असला तरी प्रत्येक महिन्याला निश्चित स्वरूपात आकारला जातो. आता हा निश्चित शुल्काचा हिस्सा वाढवण्याचा प्रस्ताव समोर आला आहे.

हा प्रस्ताव लागू झाल्यास कमी वीज वापरणाऱ्या ग्राहकांनाही मोठा फिक्स्ड चार्ज भरावा लागू शकतो. उदाहरणार्थ, एखादे कुटुंब महिनाभरासाठी बाहेरगावी गेले आणि घरात वीज वापरच झाला नाही, तरीही ठरलेले फिक्स्ड शुल्क भरावं लागेल. त्यामुळे वीज वापरली नाही तरी बिल भरावे लागेल अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते.

वीज वितरण कंपन्यांचा मोठा खर्च ट्रान्समिशन लाईन्स, सबस्टेशन, देखभाल, कर्मचारी वेतन आणि संपूर्ण वितरण यंत्रणा कार्यरत ठेवण्यासाठी होतो. मात्र त्यातील कमी हिस्सा फिक्स्ड

पान २ वर...

# राज्य राखीव पोलीस दलाची परीक्षा अखेर रद्द

## १०० पैकी ८५ प्रश्न एकाच पुस्तकातून आल्यानंतर मोठी कारवाई

मुंबई : महाराष्ट्र पोलीस भरती प्रक्रियेसंबंधी मोठी बातमी समोर आली आहे. राज्य राखीव पोलीस दल गट क्रमांक ५, दौंड येथील सशस्त्र पोलीस शिपाई भरतीची लेखी परीक्षा अखेर रद्द करण्यात आली आहे. प्रश्नपत्रिकेतील १०० पैकी तब्बल ८५ प्रश्न एका खासगी प्रकाशन संस्थेच्या सराव प्रश्नसंचातून जसेच्या तसे घेतल्याचा आरोप झाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. आता २४ मे २०२६ रोजी नव्याने लेखी परीक्षा घेतली जाणार असल्याची माहिती पोलीस दलातील वरिष्ठ सूत्रांनी दिली आहे.

ही परीक्षा दत्तकला शिक्षण संस्था, स्वामी चिंचोळी, दौंड येथे पार पडणार आहे. या संपूर्ण प्रकरणाचा पाठपुरावा एबीपी माझाने केला होता. त्यानंतर प्रशासनाने या गंभीर प्रकाराची दखल घेत भरती प्रक्रिया स्थगित केली होती. आता ती परीक्षा अधिकृतपणे रद्द करण्यात आली आहे.



२ मे २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या लेखी परीक्षेत विचारण्यात आलेले प्रश्न हे एका खासगी प्रकाशकाच्या 'पोलीस भरती प्रश्नपत्रिका सराव प्रश्नसंच १०' या पुस्तकातून घेतल्याचा आरोप करण्यात आला होता. या पुस्तकातील १०० पैकी तब्बल ८५ प्रश्न जसेच्या तसे प्रश्नपत्रिकेत आल्याचे निदर्शनास आलं.

या प्रकरणामुळे उमेदवारांमध्ये संतापाची लाट उसळली होती. भरती प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले होते. विरोधी पक्षांनीही या प्रकरणाची

पान २ वर...

## स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी निघालेल्या भाविकांवर काळाचा घाला

# भीषण अपघातात चिमुकल्यासह दोन महिलांचा जागीच मृत्यू

सोलापूर जिल्ह्यातील कोंडी इथं धक्कादायक घटना घडली. स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी पुण्याहून अक्कलकोटला निघालेल्या कुटुंबावर काळानं घाला घातला आहे. कोंडी अथं झालेल्या भीषण अपघातात दीड वर्षाच्या चिमुकल्यासह दोन महिलांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर दोघेजण गंभीर जखमी झाले आहेत. धावत्या ट्रकला भरधाव कारने पाठीमागून जोरदार धडक दिल्याने हा भीषण अपघात झाला आहे. या भीषण



अपघातानंतर परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेनंत पोलीस घटनास्थळी दाखल झाले होते.

पुण्याच्या देहूरोड येथील रवी खंडागळे यांचे कुटुंब अक्कलकोटला दर्शनासाठी जात होते. या अपघातात सिंधू रवी खंडागळे (वय ४२), त्यांची बहीण नंदा भाऊराव हाताळकर (वय ४५) आणि दीड वर्षाचा रुद्राक्ष मोरे यांचा जागीच मृत्यू

पान २ वर...



परळी येथील पंचम ज्योतिर्लिंग श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास आज संपन्न झालेल्या शिखर समितीच्या बैठकीत सुधारित ३०१.५४ कोटी रुपयांची मंजुरी दिल्याबद्दल माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यांचा सत्कार करत समस्त परळी वासियांच्या व शिवभक्तांच्या वतीने आभार व्यक्त केले.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

## संपादकीय....

# राष्ट्रवादी पुन्हा एकदा फुटीच्या उंबरठ्यावर

सुनेत्रा पवारांचे मौन, पार्थ-जय पवार यांची महत्त्वाकांक्षा आणि पटेल-तटकरे यांच्यासह अनेक नेत्यांच्या मनातील अस्वस्थता यामुळे राष्ट्रवादी फुटीच्या उंबरठ्यावर आहे हे नक्की! याचा लाभ कोणता पक्ष उठवणार हे औत्सुक्याचे ठरेल.

महायुतीमधील राष्ट्रवादीचे अजित पवार गेल्यानंतर जे राजकारण सुरू आहे त्यामुळे त्या पक्षाचे काही खरे नाही. अजितदादा यांनी प्रफुल्ल पटेल यांना कार्याध्यक्ष व सुनील तटकरे यांना प्रदेशाध्यक्ष केले होते. आता त्यांच्या दोन्ही चिरंजीवांनी राष्ट्रवादीची सूत्रे हाती घेतल्याने पक्षामध्ये प्रचंड अस्वस्थता निर्माण झाली आहे. याचा फायदा त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांनी घेतला असल्यास काही नवल नाही. ठाण्यातील माजी खासदार आनंद परांजपे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. राष्ट्रवादीच्या २२ आमदारांना घेऊन पटेल, तटकरे हे भाजपमध्ये जाणार अशी आवई राष्ट्रवादी शरद पवार गटाचे रोहित पवार यांनी उठवली आहे.

अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर दोन्ही राष्ट्रवादींच्या कथित विलीनीकरणाच्या चर्चेचे नाट्य तीन महिने चालले. अजितदादांची राष्ट्रवादी हाती घेण्यासाठी शरद पवार गटाची ती खेळी होती. त्यावर पटेल, तटकरे, भुजबळ, धनंजय मुंडे यांनी एका रात्रीत सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्री करून मात केली. शरद पवारांच्या राष्ट्रवादीचा तो डाव उधळून लावला. परंतु त्यानंतर पार्थ-जय पवार यांचे जे राजकारण सुरू झाले त्यामुळे अस्वस्थता वाढली आहे. शरद पवार यांच्या पक्षात बंड करून अजितदादा ४०-४२ आमदारांना घेऊन महायुतीत सामील झाले. स्वतः उपमुख्यमंत्री झाले. त्यांनी अनेकांना मंत्रिपदे, महत्त्वाची खाती मिळवून दिली. २०२४च्या निवडणुकीत शरद पवार गटाच्या सुप्रिया सुळे या लोकसभा निवडणुकीला उभ्या होत्या. त्यांच्या विरोधात सुनेत्रा पवारांनी लढत दिली. परंतु त्यांचा पराभव झाला. त्यावेळी शरद पवार यांनी घरच्यांना मते द्या, परक्यांना देऊ नका, असा प्रचार केला होता. सुनेत्रा पवार या पवार कुटुंबाच्या सुनबाई असताना त्या परक्या कशा झाल्या? अजितदादांनी हेतुपुरस्सर सुनेत्रा पवार यांना राज्यसभेवर पाठवले. सुप्रिया सुळे यांच्यासमोर सुनेत्रा यांना उभे करणे आवश्यक नव्हते हे अजितदादांनी कबूल केले हा त्यांचा दिलदारपणा होता.

अजितदादांनी राष्ट्रवादी सोडली तेव्हा त्यांच्या समवेत ४०-४२ आमदार होते. शरद पवारांचे दिल्लीमधील उजवे हात प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, अनेक वर्षे शरद पवारांचे सहाध्यायी असलेले दिलीप-वळसे-पाटील हेही अजितदादांबरोबर आले. २०२४ची विधानसभेची निवडणूक अजित पवारांनी महायुतीच्या झेंड्याखाली लढवली आणि आपले सर्व ४० आमदार निवडून आणले. महाराष्ट्रात आतापर्यंत इतिहास पाहिल्यास बंड करणाऱ्या नेत्यांबरोबर गेलेले आमदार पुन्हा निवडून आलेले नाहीत. अशा स्थितीत अजितदादांचे ४० आमदार महायुतीच्या झेंड्याखाली निवडून आले. दस्तुरखुद्द शरद पवारांना त्यावेळी मोठा धक्का बसला, त्यांचे जेमतेम १० आमदार निवडून आले. अजितदादांच्या नियोजनामुळे हे शक्य झाले. रोहित पवार कसेबसे काठावर उत्तीर्ण झाले. अजितदादा विरोधात प्रचारास गेले नाही म्हणून रोहित पवार विजयी झाले. अजितदादांनी रोहित पवारांना एका कार्यक्रमात तसे सुनावलेही होते. सध्या भोंग्याची जागा रोहित पवार घेऊ इच्छितात. राज्याच्या, देशाच्या राजकारणावर रोहित पवार हे बोलत असतात. पार्थ पवार हे राज्यसभेवर खासदार म्हणून गेले आहेत. आता सुनेत्रा पवारांची राज्यसभेची जागा रिक्त झाली आहे. तेथे जय पवारांनी जावे म्हणजे पवार घराण्याचे एक राजकीय वर्तुळ पूर्ण होईल. मुख्यतः या दोन्ही भावांना राष्ट्रवादी आपल्या ताब्यात घ्यायची आहे. वंशपरंपरेने पक्ष व सत्ता ही पवार घराण्याकडेच राहिली पाहिजे, ही भूमिका असावी. प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे पाहिजेत कशाला, या भावनेतून त्यांना बाहेर काढण्याचे उद्योग या दोन्ही बंधूंनी चालवले आहेत. त्यामुळे एक निश्चित की, राष्ट्रवादी अजितदादा पवार गटाचे अस्तित्व धोक्यात येणार आहे हे निर्विवाद सत्य आहे. हे सगळे सुरू असताना सुनेत्रा पवार मात्र मूग गिळून बसल्या आहेत. त्यामुळे संशय अधिक वाढत आहे. अजितदादांच्या नावाचे वलय आहे तोपर्यंत ठीक आहे, ज्यावेळी हे वलय संपेल तेव्हा परिस्थिती मुंडे कुटुंबासारखी होईल. गोपीनाथ मुंडे यांचे अपघाती निधन झाले. त्यावेळी अशीच परिस्थिती होती. पंतप्रधान-गृहमंत्री यांनी येऊन जाहीर सभा घेतल्या तरी शेवटच्या त्यावेळी पंकजा मुंडे यांना हार पत्करावी लागली. मुंडेंचे पार्थिव परळीत आले त्यावेळी चाहत्यांची बरीच गर्दी होती. अजितदादांवरील अंत्यसंस्काराच्या वेळी देखील गर्दी होती. परंतु वडिलांचे वलय संपल्यानंतर मुंडे कन्या पराभूत झाल्या. त्यामुळे वडिलांचे वलय संपल्यानंतर आपले काय होईल याचा विचार पार्थ व जय यांनी करणे आवश्यक आहे. उद्या अशीच परिस्थिती राहिल्यास राष्ट्रवादीमधील मोठा गट भाजपकडे जाऊ शकतो. शेवटी सत्ता ही महत्त्वाची आहे. सत्तेशिवाय सध्याचे राजकारणी जगू शकत नाहीत. अशोक चव्हाण यांच्यासारखे मुख्यमंत्री राहिलेले आज भाजपमध्ये आहेत. पाच राज्यांत झालेल्या विधानसभा निवडणुकांच्या निकालाच्या पार्श्वभूमीवर पार्थ-जय पवार हे पक्षातील असंतोषाकडे व अस्वस्थतेकडे लक्ष देणार नसतील तर राष्ट्रवादीचा अस्त होण्यास उशीर लागणार नाही हे कटू सत्य आहे. मुख्यमंत्र्यांकडे अर्थ खाते गेल्याने राष्ट्रवादी आमदारांमध्ये निधीवरून चलबिचल सुरू झाली आहे. सुनेत्रा पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून ही व्यथा अलीकडेच कळवली आहे. निधीचे समान वाटप होणे आवश्यक आहे, असे सुनेत्रा पवार यांनी म्हटले आहे. सुनील तटकरे व प्रफुल्ल पटेल यांनी सिल्व्हर ओकवर जाऊन शरद पवारांची अलीकडेच भेट घेतली. त्या भेटींबाबत उलटसुलट चर्चा सुरू झाली आहे. त्यानंतर राष्ट्रवादीच्या प्रमुख नेत्यांची एक बैठकही झाली. या बैठकीत पार्थ व जय पवार यांच्यामुळे निर्माण झालेल्या स्थितीवर चर्चा झाली. आता ही चर्चा प्रसिद्धी माध्यमांसमोर सुरू झाली. या सर्व बाबींमध्ये सुनेत्रा पवारांची भूमिका ही महत्त्वाची असून त्याही पुत्रप्रेमामुळे याकडे कानाडोळा करत असतील तर पक्षाची स्थिती आणखी वाईट होईल.

# देशी गाईला राष्ट्रीय पशूचा दर्जा द्या; निरुपयोगी जनावरांबाबत स्पष्ट भूमिका घ्या

## सर्व धर्मीय नागरिक एकवटले; जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन सादर

बीड । प्रतिनिधी

देशी गाईला 'राष्ट्रीय पशू'चा दर्जा देण्यात यावा तसेच कमी उत्पादनक्षम जनावरांच्या संदर्भात स्पष्ट व व्यवहार्य धोरण ठरविण्यात यावे, अशी मागणी बीड जिल्ह्यातील सर्व धर्मीय नागरिकांनी निवेदनाद्वारे केली आहे. हे निवेदन देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सादर करण्यात आले असून, जिल्हाधिकारी,बीड यांच्या मार्फत पाठविण्यात आले आहे.




निवेदनात म्हटले आहे की, भारत देश हा विविध संस्कृती आणि परंपरांचा संगम असून गाईला विशेष धार्मिक, सामाजिक व आर्थिक महत्त्व आहे. हिंदू धर्मात गाईला 'गोमाता' म्हणून पूजनीय स्थान आहे. याशिवाय शेती व्यवस्थेतही गाईचे मोठे योगदान असून, शेणखत व गोमूत्र सेंद्रिय शेतीसाठी उपयुक्त ठरते. दुग्धउत्पादनामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही चालना मिळते.

देशी गाईंची संख्या घटत चालल्यामुळे त्यांच्या संरक्षणासाठी ठोस उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. देशी गाईला 'राष्ट्रीय पशू'चा दर्जा दिल्यास संवर्धनासाठी प्रभावी धोरणे राबविता येतील आणि जनजागृतीही वाढेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.दरम्यान,जर्सी व इतर मिश्रित जातींच्या जनावरांची उत्पादकता कमी झाल्यानंतर त्यांचे पालन करणे पशुपालकांसाठी आर्थिकदृष्ट्या कठीण ठरत असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे अशा निरुपयोगी किंवा कमी उत्पादनक्षम जनावरांच्या बाबतीत, विद्यमान कायद्यांच्या चौकटीत राहून आणि पशूकल्याणाचे नियम पाळून, त्यांच्या कायदेशीर कत्तलीस परवानगी देण्यासाठी स्पष्ट धोरण आखावे, अशी मागणी शहरातील सर्व जाती धर्माच्या नागरिकांनी एकत्र येऊन निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्यामार्फत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सादर करण्यात आले आहे.तसेच पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनाही प्रत पाठविण्यात आली आहे.यावेळी पत्रकार पठाण अमरजान,बीड बचाव मंचाचे नितीन जयभाय,शेख नदीम,पत्रकार मुस्तफा पठाण,शेख पाशाभाई,अशोक (मायकल) वडमारे,राम मार्कंडे,शेख सलमान,शेख शकील,फेरोज शेख, शेख रियाज सह इतर सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**तहसीलदार, मामलेतदार तथा कार्यकारी दंडाधिकारी**
**कार्यालय अंबड**
**प्रशासकीय इमारत ता अंबड**
जा.क्र.२०२६/जमा-१/कावी-२३२१
दिनांक १५.०५.२०२६

**जाहीर प्रगटन**

ज्याअर्थी मौजे नगर परिषद अंबड येथील लिलावात प्लॉट ची ७/१२ वार नोंद घेणे बाबत. अर्जदार सुदाम मरोबा शरणांगत रा. अंबड ता. अंबड जि. जालना यांनी दाखल केलेल्या अर्जानुसार, तहसीलदार अंबड यांचे न्यायालयात सुनावणी ठेवण्यात आली होती. त्यानुसार दिनांक १४.०५.२०२६ रोजी सुनावणी ठेवण्यात अली होती. तथापी खालील प्रमाणे गैरअर्जदार सदर सुनावणीसाठी हजर राहत नाहीत.

प्रतीवादी :- १. मुख्याधिकारी नगर परिषद अंबड रा. अंबड ता. अंबड जि. जालना

वरिल प्रमाणे गैरअर्जदार सुनावणीसाठी गैरहजर आहेत मौजे नगर परिषद अंबड येथील लिलावात प्लॉट ची ७/१२ वार नोंद घेणे बाबत निर्णय पारित करणे आवश्यक आहे. सबब या द्वारे आपणास जाहीर नोटीस देवुन कळविण्यात येते की, आपण ही नोटीस प्रसिध्द झाल्याचे तारखे पासुन ०७ दिवसाचे आत अथवा पुढील सुनावणी दिनांक २१.०५.२०२६ रोजी दु. २.०० वाजता आपले म्हणणे तहसीलदार अंबड यांचे न्यायालयात पुराव्यासह समक्ष दाखल करावेत. आपण मुदतीमध्ये किंवा व्यक्तीशः हजर राहुन आपले म्हणणे दाखल केले नाही. त्यानुसार उपलब्ध अभिलेखे तपासुन गुणवत्तेनुसार सदर प्रकरणात निर्णय आदेश पारित करण्यात येईल.

दिनांक- १५/०५/२०२६
मुद्रा

**तहसीलदार अंबड**

**जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२६/२९२**
**कार्यालय नगर परिषद, अंबड**
**दिनांक :-०७/०५/२०२६**
**नांव बदलण्याचा**
**जाहिरनामा**

अर्जदार श्री. श्रीमती. श्रीमती:

१) अन्वर अजगर बागवान २) मजहर अझगर चौधरी ३) जफर अजगर चौधरी ४) अकबर अझगर चौधरी

प्रकरण - सिटि सर्वे नं ३६८ मधील नं प घर नं ४-१५० चे हस्तातरण करणे बाबत

वरील सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नका अर्जदार नकाशात व बागवान नायकर चौक येथे न.प. मालमत्ता घर क्र. (४-१५०) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला इमारतीचे/जायेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा, नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतु:सिमा
पुर्व :- न प घर न ४-१५०
पश्चिम :- रस्ता
दक्षिण :- समद अहेमद बागवान यांचे घर
उत्तर :- माजिद उस्मान शेख यांचे घर

**स्वाक्षरित/-**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबड**

**तहसीलदार, मामलेतदार तथा कार्यकारी दंडाधिकारी**
**कार्यालय अंबड**
**प्रशासकीय इमारत ता अंबड**
जा.क्र.२०२६/जमा-१/कावी-२३३०
दिनांक १५.०५.२०२६

**जाहीर प्रगटन**

ज्याअर्थी मौजे नगर परिषद अंबड येथील लिलावात प्लॉट ची ७/१२ वार नोंद घेणे बाबत. अर्जदार निळकंठ माधवराव भालेराव रा. अंबड ता. अंबड जि. जालना यांनी दाखल केलेल्या अर्जानुसार, तहसीलदार अंबड यांचे न्यायालयात सुनावणी ठेवण्यात आली होती. त्यानुसार दिनांक १४.०५.२०२६ रोजी सुनावणी ठेवण्यात अली होती. तथापी खालील प्रमाणे गैरअर्जदार सदर सुनावणीसाठी हजर राहत नाहीत.

प्रतीवादी :- १. मुख्याधिकारी नगर परिषद अंबड
रा. अंबड ता. अंबड जि. जालना

वरिल प्रमाणे गैरअर्जदार सुनावणीसाठी गैरहजर आहेत मौजे नगर परिषद अंबड येथील लिलावात प्लॉट ची ७/१२ वार नोंद घेणे बाबत निर्णय पारित करणे आवश्यक आहे. सबब या द्वारे आपणास जाहीर नोटीस देवुन कळविण्यात येते की, आपण ही नोटीस प्रसिध्द झाल्याचे तारखे पासुन ०७ दिवसाचे आत अथवा पुढील सुनावणी दिनांक २१.०५.२०२६ रोजी दु. २.०० वाजता आपले म्हणणे तहसीलदार अंबड यांचे न्यायालयात पुराव्यासह समक्ष दाखल करावेत. आपण मुदतीमध्ये किंवा व्यक्तीशः हजर राहुन आपले म्हणणे दाखल केले नाही. त्यानुसार उपलब्ध अभिलेखे तपासुन गुणवत्तेनुसार सदर प्रकरणात निर्णय आदेश पारित करण्यात येईल.

दिनांक- १५/०५/२०२६
मुद्रा

**तहसीलदार अंबड**

**तहसीलदार, मामलेतदार तथा कार्यकारी दंडाधिकारी**
**कार्यालय अंबड**
**प्रशासकीय इमारत ता अंबड**
जा.क्र.२०२६/जमा-१/कावी-२३२१
दिनांक १५.०५.२०२६

**जाहीर प्रगटन**

ज्याअर्थी मौजे नगर परिषद अंबड येथील लिलावात प्लॉट ची ७/१२ वार नोंद घेणे बाबत. अर्जदार हौसाबाई मदन तुपे रा. अंबड ता. अंबड जि. जालना यांनी दाखल केलेल्या अर्जानुसार, तहसीलदार अंबड यांचे न्यायालयात सुनावणी ठेवण्यात आली होती. त्यानुसार दिनांक १४.०५.२०२६ रोजी सुनावणी ठेवण्यात अली होती. तथापी खालील प्रमाणे गैरअर्जदार सदर सुनावणीसाठी हजर राहत नाहीत.

प्रतीवादी :- १. मुख्याधिकारी नगर परिषद अंबड
रा. अंबड ता. अंबड जि. जालना

वरिल प्रमाणे गैरअर्जदार सुनावणीसाठी गैरहजर आहेत मौजे नगर परिषद अंबड येथील लिलावात प्लॉट ची ७/१२ वार नोंद घेणे बाबत निर्णय पारित करणे आवश्यक आहे. सबब या द्वारे आपणास जाहीर नोटीस देवुन कळविण्यात येते की, आपण ही नोटीस प्रसिध्द झाल्याचे तारखे पासुन ०७ दिवसाचे आत अथवा पुढील सुनावणी दिनांक २१.०५.२०२६ रोजी दु. २.०० वाजता आपले म्हणणे तहसीलदार अंबड यांचे न्यायालयात पुराव्यासह समक्ष दाखल करावेत. आपण मुदतीमध्ये किंवा व्यक्तीशः हजर राहुन आपले म्हणणे दाखल केले नाही. त्यानुसार उपलब्ध अभिलेखे तपासुन गुणवत्तेनुसार सदर प्रकरणात निर्णय आदेश पारित करण्यात येईल.

दिनांक- १५/०५/२०२६
मुद्रा

**तहसीलदार अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-८४ दि.२७.०१.२०२६**

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **लक्ष्मीबाई शिवाजी शिंदे, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | दुर्गा शिवाजी शिंदे | मुलगी | ०३.०१.२०१८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-८३ दि.२७.०१.२०२६**

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **कृष्णा खंडु बाबर, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | संजीवनी कृष्णा बाबर | मुलगी | ०१.०८.२०१८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-८२ दि.२७.०१.२०२६**

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **कृष्णा खंडु बाबर, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अश्विनी कृष्णा बाबर | मुलगी | ०१.०८.२०१७ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**


## पान १ वरून...


**सर्वसामान्यांना ४२०...**

चार्जमधून वसूल होतो. रूफटॉप सोलरच्या वाढत्या वापरामुळे अनेक ग्राहक स्वतःच वीज निर्मिती करू लागले आहेत, त्यामुळे वितरण कंपन्यांचे उत्पन्न घटत असले तरी पायाभूत सुविधांचा खर्च कायम राहतो.

प्रस्तावानुसार घरगुती आणि कृषी ग्राहकांसाठी फिक्स्ड चार्जचा हिस्सा एकूण खर्चाच्या २५ टक्क्यांपर्यंत वाढवला जाऊ शकतो. तर उद्योग, मॉल आणि मोठ्या व्यावसायिक ग्राहकांसाठी २०३० पर्यंत हा हिस्सा १०० टक्क्यांपर्यंत नेण्याचा विचार आहे. यामुळे भविष्यात वीज बिलातील मोठा भाग निश्चित शुल्काच्या स्वरूपात असू शकतो.

महागाई, ईएमआय आणि रोजच्या खर्चामुळे आधीच त्रस्त असलेल्या मध्यमवर्गासाठी हा प्रस्ताव चिंतेचा विषय ठरू शकतो. विशेषतः वीज बचत करून बिल कमी ठेवणाऱ्या कुटुंबांवर याचा अधिक परिणाम होण्याची शक्यता आहे. मात्र सध्या हा केवळ प्रस्ताव असून अंतिम निर्णय संबंधित वीज नियामक आयोगांकडून घेतला जाणार आहे.

**भीषण अपघातात....**

झाला आहे. तर रुद्राक्षचे वडील उमेश प्रकाश मोरे (वय ३२) आणि आई साक्षी मोरे हे दोघे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. सदर घटनेची नोंद सोलापूरच्या सिव्हिल पोलिसात झाली असून पोलिस अधिक तपास करत आहेत.

पालघर जिल्ह्यात धक्कादायक घटना घडली आहे. मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर वऱ्हाडाच्या ट्रकचा भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. वऱ्हाडाची ट्रक आणि कंटेनरमध्ये हा भीषण अपघात झाला. यामध्ये १२ जणांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. तर २० ते २५ जण जखमी झाल्याची माहिती मिळत आहे. दरम्यान, मृत्यूच आकडा वाढण्याची भिती व्यक्त केली जात आहे.

**परळी वैजनाथ, भीमाशंकर,....**

जतन, संवर्धन आणि परिसर सुशोभीकरणासाठी १३४.८० कोटी रूपयांचा विकास आराखडा आहे. यामध्ये नियोजित असलेल्या पायाभूत सुविधांचा विकास, नियोजित प्रेक्षक गॅलरी, नवे पादचारी मार्ग आणि लँडस्केपिंग,राज सदरेचे पुनरुज्जीवन, बुरूजांचे संवर्धन, पर्यटन आकर्षणे,अत्याधुनिक लटकता पूल,स्वच्छता आणि विश्रांती गृहांची कामे तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली वेळेत पार पाडावीत, असे फडणवीस यांनी सांगितले.

संगम माहुली (सातारा) समाधी स्थळासाठी १३३ कोटींची तरतूद

संगम माहुली समाधीस्थळ संवर्धनासाठी १३३ कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. याअंतर्गत महाराणी ताराबाई, महाराणी येसूबाई आणि छत्रपती शाहू महाराज यांच्या समाधी स्थळांचा जीर्णोद्धार आणि लँडस्केप विकास केला जाणार आहे. याशिवाय, ऐतिहासिक संगमेश्वर


## पान १ वरून...


मंदिर आणि घाटाचे संवर्धन, नवीन हँगिंग ब्रिज (झुलता पूल), व्‍ूइंग गॅलरी आणि सुसज्ज पाथ वेची निर्मिती करून या परिसराला जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ बनविण्यात येईल, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

श्री क्षेत्र घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग विकास आराखडा (वेरुळ)साठी २१० कोटी रूपयांची तरतूद

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वेरुळ येथील प्रसिद्ध घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग मंदिराच्या विकासासाठी सुधारित आराखडा तयार करण्यात आला आहे. या प्रकल्पाची एकूण किंमत आता २१०.४५ कोटी रुपये प्रस्तावित करण्यात आली असून, यामध्ये ५३.८२ कोटींच्या वाढीव निधीची मागणी समाविष्ट आहे. सध्या या ठिकाणी भाविकांसाठी अत्याधुनिक भक्त निवास, दर्शन बारी (प्रतीक्षागृह), शॉपिंग कॉम्प्लेक्स, फंक्शन हॉल, घाट आणि १.६ किमीचा बा वळण रस्ता (बायपास रोड) यांसारखी कामे गतीने करावीत, असे निर्देश फडणवीस यांनी दिले.

**स्थानिक स्वराज्य संस्थेच्या....**

स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या निवडणुकांबाबतचा प्रस्ताव भारत निवडणूक आयोगाला सादर केला होता. या प्रस्तावाच्या आधारे निवडणूक आयोगाने विधान परिषदेच्या निवडणुकीचा कार्यक्रम आज घोषित केला. या निवडणुकीसाठी महापालिका, नगरपालिका, नगर पंचायत, कटक मंडळे आणि जिल्हा परिषदेचे सदस्य मतदान करणार आहेत.

नागपूरची पोटनिवडणूक

महसूल मंत्री आणि भाजपचे नेते चंद्रशेखर बावनकुळे हे २०२२ मध्ये नागपूर स्थानिक प्राधिकारी मतदारसंघातून निवडून गेले होते. मात्र, २०२४ मध्ये विधानसभेवर निवडून आल्यानंतर त्यांनी विधान परिषदेचा राजीनामा दिला. या जागेची पोटनिवडणूक होत आहे. नागपूरच्या जागेची मुदत १ जानेवारी २०२८ रोजी संपत आहे. त्यामुळे नागपूर पोटनिवडणुकीत निवडून येणा-या उमेदवाराला विधान परिषदेचा जेमतेम दीड वर्षाचा कालावधी मिळणार आहे.

या मतदारसंघांसाठी होणार निवडणूक

सोलापूर, अहिल्यानगर, ठाणे, जळगाव, सांगली-सातारा, नांदेड, यवतमाळ, पुणे, भंडारा-गोंदिया, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, नाशिक, वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली, अमरावती, धाराशिव-लातूर-बीड, परभणी-हिंगोली आणि छत्रपती संभाजीनगर-जालना.

**राज्य राखीव पोलीस....**

चौकशी करण्याची मागणी केली होती.

एबीपी माझाने हा प्रकार उघडकीस आणल्यानंतर पोलीस उपमहानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी ४ मे रोजी सखोल चौकशीचे आदेश दिले. चौकशी पूर्ण होईपर्यंत भरती प्रक्रिया स्थगित करण्यात आली होती. यानंतर अप्पर पोलीस महासंचालकांनी संबंधित परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला असून उमेदवारांना पुन्हा परीक्षा द्यावी लागणार आहे.

# ग्रामीण भागातील नागरिकांशी दुजाभाव करू नका

## नसता उर्जा मंत्र्यांकडे जाऊन तक्रार करू - भारतीय जनता पक्षाचे नेते बाळराजे पवार

गेवराई : विद्युत वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी सरकारी धोरणाला अनुसरून ग्रामीण भागातील गोरगरीब जनतेला लाईट द्यावी, आमची काहीच तक्रार नाही. परंतु, काही गावात दहा बारा तास आणि काही गावात केवळ सहा ते सात तास विद्युत पुरवठा होतो. हा अन्याय दूर झाला पाहिजे,अशी अपेक्षा भारतीय जनता पक्षाचे नेते बाळराजे पवार यांनी येथे आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत बोलताना केली. दरम्यान, एवढ्या कडकडीत उन्हात लाईट नसल्याने सर्व सामान्य नागरिकांचे हाल होत असून, याकडे गांभीर्यपूर्वक लक्ष द्या, नसता राज्याचे उर्जा मंत्री ना. अतुल सावे, ना. मेघनाताई बोर्डीकर यांच्याकडे जाऊन न्याय मागाव लागेल, असा इशारा ही, पवार यांनी विद्युत वितरण कंपनीला दिला आहे.

गेवराई तालुक्यातील ग्रामीण भागात लाईट नसल्याने अनेक प्रश्न निर्माण झाले असून, काही गावात महिनाभर लाईट नाही.त्यामुळे, जनतेचे प्रचंड हाल होत असल्याने नागरिकांच्या तक्रारीची दखल घेऊन, सोमवार ता. १८ रोजी भारतीय जनता पक्षाचे नेते बाळराजे पवार यांनी सकाळी अकरा वाजता गेवराई येथील विद्युत वितरण कंपनीच्या उपविभागीय कार्यालयात जाऊन आढावा बैठक घेतली. सिरसदवी, धोंडराई, रामनगर तांडा, पौळाची वाडी, म्हांडुळगा तांडा, रूई, धानोरा, गौंडगाव, धोंडराई तांडा इ. गाव परीसरात लाईटच्या संदर्भात अडचणी निर्माण झालेल्या आहेत. त्या प्रश्नांवर उपविभागीय अभियंता एस.एम.मोरे यांच्याशी सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी ग्रामीण भागातील सरपंच, माजी सरपंच, कार्यकर्ते, नागरिकांनी विद्युत वितरण कंपनीच्या लाईट संदर्भात समस्यांचा पाढा वाचून काढला. एक्स्प्रेस फिडर असून देखील, ग्रामीण भागातील अनेक गावांना व्यवस्थित लाईट दिली जात नाही. कुठे चार तास तर काही ठिकाणी सहा, तास लाईट दिली जाते. अनेक गावात लाईट च्या तारा घरावरून गेल्यात, त्या तारा अगदी हाताला लागतील, एवढ्या कमी उंचीवर आहेत. काही ठिकाणी पोल नाहीत, तर त्या ठिकाणी केवळ वायर अंथरून लाईट दिली. या सगळ्या धोकादायक गोष्टी आहेत. लेखी, तोंडी तक्रारी करून ही, अधिकारी, लाईनमन दाद देत नाहीत. त्याच बरोबर, गेवराई शहरातील दारलूम आणि गेवराई शहरातील नवीन बसस्थानक येथे नव्याने डीपी आवश्यक असून, गेवराई शहरातील विविध भागात लाईटचा लपंडाव सुरू आहे. त्यामुळे, बिले वेळेवर भरून ही,



शहरातील नागरिकांना मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. या सगळ्या प्रकरणात भारतीय जनता पक्षाचे नेते बाळराजे पवार यांनी लक्ष देऊन, गेवराई च्या उपविभागीय कार्यालयात बैठक घेऊन अधिकारी व कर्मचाऱ्यांना जाब विचारला. एवढ्या कडक उन्हाळ्यात तुम्ही जनतेच्या भावनेशी खेळताहेत. महिनाभरापासून लोक अंधारात आहेत. दुजाभाव करून, लाईट बंद, चालू ठेवली जाते. कुठे सहा तास, कुठे आठ तास लाईट दिली जाते. या सगळ्या गोष्टी चुकीच्या आणि अन्यायकारक आहेत. त्यामुळे, ग्रामीण भागातील गोरगरीब जनतेवर अन्याय करू नका, अशी विनंती भारतीय जनता पक्षाचे नेते बाळराजे पवार यांनी यावेळी बोलताना केली आहे. विद्युत वितरण कंपनीच्या कारभारात सुधारणा व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त करून ये म्हणाले की,एवढ्या कडकडीत उन्हात लाईट नसल्याने सर्व सामान्य नागरिकांचे हाल होत असून, याकडे गांभीर्यपूर्वक लक्ष द्या, नसता वरिष्ठांकडे जाऊन न्याय मागाव लागेल, असा इशारा ही त्यांनी विद्युत वितरण कंपनीला दिला आहे. यावेळी यावेळी उपनगराध्यक्ष भगवान जिजा घुंबार्डे , माजी नगरसेवक राहुल जिजा खंडागळे, नप सभापती बदियोद्दीन सय्यद, नगरसेविका सुमित्रा ताई थोरात, संजय जाधव , प्रकाश काका सुरवसे, सभापती प्रशांत राख , सूर्यकांत शिंदे, माऊली वादे, नगरसेवक ज्ञानेश्वर भाले, दिलीप मोरे, आखेब काझी, भरतजी गायकवाड, कृष्णा पाटोळे बाळासाहेब गायकवाड , अशोक वडगणे, प्रा. प्रल्हाद येळापुरे, अशोक चव्हाण, शिवाजी सोलाट, विलास शिंदे ,बाळासाहेब उबाळे, दिनकर भाऊ राठोड नुमान फारुकी रामेश्वर पानखडे, दत्ता गिरी, विलास शिंदे, शोयब आत्तार, श्याम निकम, सादिक चाचू , किसन देवा ,राम चोरमले ,जमील पठाण सर, शेख मोहीम, परमेश्वर राठोड ,संतोष राठोड ,ऋषिकेश पवार ,आत्माराम जगताप ,सिद्धेश्वर सोलाट, रामभाऊ येवले, विकास मिठे ,महारुद्र खुणे, राजाभाऊ इदके, पंडित इदगे, महादेव खुणे, विठ्ठल खुणे, संजय इतके, नारायण खुणे ,दादा रावडे, कपिल जाधव, उमेश पाटील, सचिन एडके ,भाऊसाहेब पवार ,दादासाहेब ठवरे ,सोना भाऊ ,आडागळे गणेश, शिंदे ,भागवतराव आडे ,शेख मोहन मामू ,शुभम सोलाट ,महेश गांडुळे, किसन होंडे ,शुभम चौधरी ,कृष्णा लोणकर ,अमोल परभळे ,सुरेश बोर्डे,संजय हगवणे ,मोबीन पठाण, ज्ञानेश्वर वरवडे, रोहित काचोळे, श्रीराम शिंदे ,राजू पठाण, पिनू गायकवाड यांच्यासह ग्रामीण भागातील ग्रामस्थ उपस्थित होते.

# दरवर्षीप्रमाणे याही वर्षी अंबाजोगाईत श्री गजानन विजय ग्रंथाच्या सामुदायिक पारायण सोहळ्याचे आयोजन

## काल्याचे कीर्तन-दीपोत्सव व महाप्रसादाने होणार सांगता

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

येथील श्री संत गजानन महाराज भक्त मंडळाच्या वतीने श्री गजानन विजय ग्रंथाच्या चार दिवसीय सामुदायिक पारायण सोहळ्याचे आयोजन २६ मे ते २९ मे दरम्यान सकाळी ७ ते १० या वेळेत शहरातील देशपांडे गल्लीतील धाकटे देवघर येथे करण्यात आले आहे. सोहळ्याची सांगता शुक्रवार, २९ मे रोजी सकाळी १० वाजता हभप शिवाजी महाराज मुळे (आडस) यांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार असून, त्यानंतर पालखी उत्सव, महाआरती, महाप्रसाद, 'सत्संग श्री गजाननाचा' तसेच 'श्रीं'ची दीपोत्सवात शेजारती होऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात येणार आहे. या पारायण सोहळ्यासह विविध धार्मिक कार्यक्रम व महाप्रसादाचा लाभ अंबाजोगाई शहर व पंचक्रोशीतील भाविकांनी घ्यावा, असे आवाहन श्री संत गजानन महाराज भक्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

शहरातील श्री संत गजानन महाराज भक्त मंडळाच्या वतीने हभप वै. दत्तात्रय जोशी महाराज नळेगावकर यांच्या कृपाआशीर्वादाने गेली १३ वर्षे श्री गजानन विजय ग्रंथाचे सामुदायिक पारायण सोहळे तसेच भक्ती संगीत, कीर्तन व पालखी उत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे. प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी २६ मे ते २९ मे २०२६ दरम्यान पारायण सोहळ्याचे आयोजन देशपांडे गल्लीतील धाकटे देवघर येथे करण्यात आले असून, यंदाचे हे १४ वे वर्ष आहे.चार दिवसीय पारायण सोहळा प्रमुख हभप आनंद महाराज जोशी नळेगाव यांच्या प्रमुख उपस्थितीत सकाळी ७ ते १० या वेळेत पार पडणार आहे. अधिक ज्येष्ठ शुद्ध ११, मंगळवार, २६ मे रोजी पहाटे ४ वाजता मंगलध्वनीने सोहळ्याची सुरुवात होणार आहे. पहाटे ५ वाजता 'श्रीं'ना रुद्राभिषेक व आरती होईल. त्यानंतर सकाळी ७ ते १० या वेळेत श्री गजानन विजय ग्रंथाचे पारायण, महाप्रसाद तसेच सायंकाळी ५ वाजता श्री विठ्ठल-रुक्मिणी महिला भजनी मंडळाचे सांप्रदायिक भजन होणार आहे. सायंकाळी



६.३० वाजता हभप श्रीपाद बुवा अभ्यंकर, पिंपरी-चिंचवड (पुणे) यांचे कीर्तन होईल.२७ मे रोजी पारायण, आरती तसेच सायंकाळी ५ वाजता सरोजनी देशपांडे, वैशाली विडेकर व मधुरा बाभुळगावकर यांचे भक्ती संगीत होणार असून, सायंकाळी ६.३० वाजता हभप प्रभंजन महाराज भगत (लोणी) यांचे कीर्तन होईल.

गुरुवार, २८ मे रोजी अध्याय १५ ते २१ चे पारायण, त्यानंतर ग्रंथपूजन, ग्रंथदिंडी, पारायण आरती तसेच श्री गजानन महाराजांचा पालखी उत्सव होणार आहे. सायंकाळी ५ वाजता अंबानगरीतून 'श्रीं'चा पालखी सोहळा धाकटे देवघर, देशपांडे गल्ली - बाजीप्रभू चौक - केशवनगर रोड - दीनदयाळ कॉलनी - श्री गजानन महाराज मंदिर, चौसाळकर कॉलनी - डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक - कुत्तर विहीर - देशपांडे गल्ली - धाकटे देवघर या मार्गाने निघणार आहे.दि. २९ मे रोजी पहाटे ५ वाजता 'श्रीं'ना रुद्राभिषेक व आरती होईल. सकाळी १० वाजता हभप शिवाजी महाराज मुळे (आडस) यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. त्यानंतर मंडळाच्या वतीने 'कै. दत्तात्रय महाराज जोशी स्मृती आध्यात्मिक सेवा पुरस्कार' हभप रामचंद्र महाराज चिंचोलकर, संभाजीनगर (मुख्य प्रवर्तक, श्रीक्षेत्र पैठण ते श्रीक्षेत्र शेगाव पायी दिंडी सोहळा) यांना प्रदान करण्यात येणार आहे. त्यानंतर महाआरती व महाप्रसाद होणार आहे.रात्री ८ वाजता श्री संत गजानन महाराज भक्त मंडळ, अंबाजोगाई संचलित 'सत्संग श्री गजाननाचा' तसेच 'श्रीं' ची दीपोत्सवात शेजारती होऊन कार्यक्रमाची सांगता होणार आहे.

पारायण सोहळा, श्रीची मिरवणूक व विविध धार्मिक कार्यक्रम व महाप्रसादाचा लाभ अंबाजोगाई शहर व पंचक्रोशीतील भाविकांनी घ्यावा, असे आवाहन श्री संत गजानन महाराज भक्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# धनंजय मुंडेंच्या प्रयत्नांना यश; श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास सुधारित ३०१.५४ कोटींची मान्यता

## वैद्यनाथ ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्र विकास आराखडा आता नियोजन विभाग राबवणार

मुंबई (प्रतिनिधी)

पंचम ज्योतिर्लिंग श्री वैद्यनाथ मंदिर व परिसराच्या विकासासाठी आखण्यात आलेल्या श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास सुधारित ३०१.५४ कोटी रुपयांची मान्यता आज संपन्न झालेल्या शिखर समितीच्या बैठकीत राज्य सरकारने दिली असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बैठकीत अधिकृतपणे हे जाहीर केले आहे. माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांच्या प्रयत्नांना मोठे यश मिळाले आहे.

विशेष म्हणजे दिवंगत नेते स्व. अजितदादा पवार हयात असताना धनंजय मुंडे यांनी वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखडा हा सार्वजनिक बांधकाम विभागाकडून नियोजन विभागाकडे वर्ग करून नियोजन विभागामार्फत राबवण्याची मागणी केली होती, त्या मागणीसही शिखर समितीने मंजुरी दिली असून, आता श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्र विकास आराखडा नियोजन विभागाकडून राबवण्यात येणार आहे.

या बैठकीत धनंजय मुंडे यांनी सध्या सुरू असलेल्या व आगामी काळात हाती घेण्यात येणाऱ्या विविध कामांबाबत सविस्तर चर्चा करत आगामी सर्व कामांना एकत्रित प्रशासकीय मान्यता देण्याची विनंती केली, त्यासही सकारात्मक प्रतिक्रिया देण्यात आली. श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्र विकास आराखडा पूर्वी २८६ कोटी रुपयांचा होता, त्यास वाढीव मान्यता दिल्याने धनंजय मुंडे यांनी राज्य सरकारचे विशेष आभार मानले आहेत. या बैठकीस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा वहिनी अजितदादा पवार, मंत्री गणेश नाईक, मंत्री छत्रपती शिवेंद्रराजे भोसले, मंत्री जयकुमार गोरे यांच्या सह वरिष्ठ अधिकारी आदी उपस्थित होते.



# व्याख्याते प्रदीप सोळुंके यांनी मुलींच्या वसतिगृहाला दिली ५,७४८ पुस्तकाची भेट

विद्यार्थीनी या पुस्तकांतून ज्ञान संपादन करून आपले मस्तक सशक्त करावे - व्याख्याते प्रदीप सोळूंके

मस्साजोग (प्रतिनिधी)

मराठा सेवा संघाच्या वतीने आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंती औचित्य साधून आयोजित संत तुकोबाराय व्याख्यानमालेत एका स्तुत्य उपक्रमाची नोंद झाली आहे.दर महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी होणाऱ्या या व्याख्यानमालेच्या अंतर्गत, १६ मे रोजी छत्रपती संभाजीनगर येथील जिजाऊ मंदिर येथे वक्ते प्रदीप सोळंके यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी वक्ते प्रदीप सोळुंके यांनी आपल्या वैयक्तिक ग्रंथालयातील ५ हजार ७४८ पुस्तके मुलींच्या वसतिगृहाला भेट देऊन एक अनोखा आदर्श निर्माण केला आहे.प्रदीप सोळुंके यांनी आपल्या व्याख्यानातून छत्रपती संभाजी महाराज यांच्या अष्टपैलू व्यक्तित्वावर प्रकाश टाकला. व विद्यार्थीनी या पुस्तकांतून ज्ञान संपादन करून आपले मस्तक सशक्त करावे, असे मार्गदर्शन प्रदीप सोळुंके यांनी केले आहे.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून टी. आर. जाधव, प्रा. चंद्रकांत भराट संस्थापक प्रदेशाध्यक्ष, छावा, डी. एम.पाटील जिल्हाध्यक्ष, मराठा सेवा संघ, धनंजय पाटील विभागीय अध्यक्ष, प्रा. विजया मुसंडे आणि देवरावजी पतंगे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजीव साठे यांनी केले, तर आभार वैभव बोडखे यांनी मानले आहे.

# इंधन दरवाढीच्या पार्श्वभूमीवर एसटी भाडेवाढीचा प्रस्ताव विचाराधीन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

## डिझेल दरवाढीमुळे एसटी महामंडळावर वार्षिक १२४ कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार

मुंबई (प्रतिनिधी)

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वाढत्या इंधन खर्चाच्या पार्श्वभूमीवर प्रवासी भाडेवाढीचा प्रस्ताव विचाराधीन असला, तरी तत्काळ भाडेवाढ करण्यात येणार नसल्याची माहिती परिवहन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

डिझेल दरवाढीच्या पार्श्वभूमीवर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील दालनात महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर तसेच अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यावेळी मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, डिझेलच्या दरात झालेल्या वाढीमुळे महामंडळावर वार्षिक सुमारे १२४ कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार पडणार आहे. एसटी महामंडळाला दररोज सरासरी १०.८७ लाख लिटर डिझेलची आवश्यकता भासते. सध्या इंडियन ऑईल कॉर्पोरेशनमार्फत डिझेलचा पुरवठा केला जात असून, मागील आठवड्यात प्रति लिटर ८८.२१ रुपये असलेला दर आता वाढून ९१.३१ रुपये झाला आहे. त्यामुळे प्रति लिटर ३ रुपये १० पैशांची वाढ नोंदविण्यात आली आहे.

या दरवाढीमुळे महामंडळाला दररोज अंदाजे ३३ लाख ७० हजार रुपयांचा अतिरिक्त खर्च सहन करावा लागत असून, मासिक स्तरावर हा भार सुमारे १० कोटी रुपये, तर वार्षिक स्तरावर सुमारे



१२४ कोटी रुपयांपर्यंत जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.ते पुढे म्हणाले की, एसटी महामंडळ सध्या आर्थिक अडचणींचा सामना करीत असून, एप्रिल २०२६ मध्ये महामंडळाला सुमारे ७६ कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागला आहे. वाढत्या इंधन खर्चाचा थेट परिणाम महामंडळाच्या आर्थिक स्थितीवर होत असून, भविष्यात प्रवासी भाडेवाढीचा निर्णय घेणे आवश्यक ठरू शकते.

तथापि, कोणतीही भाडेवाढ तातडीने लागू करण्यात येणार नसून, केंद्र आणि राज्य शासनाच्या मार्गदर्शनाखाली इंधन दरवाढीच्या अनुषंगाने भाडेवाढीचा प्रस्ताव राज्य परिवहन प्राधिकरणाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात येणार आहे. संबंधित प्राधिकरणाची मान्यता मिळाल्यानंतरच अंतिम निर्णय घेण्यात येईल, असेही मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

एसटीने प्रवास करणाऱ्या सर्वसामान्य प्रवाशांवर कमीत कमी आर्थिक भार पडावा यासाठी शासन विविध पर्यायांचा विचार करीत असून, इंधन बचत, ई-बसचा वाढता वापर, खर्च नियंत्रण तसेच महसूलवाढीच्या उपाययोजनांवर विशेष भर देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

ग्रामीण भागातील नागरिकांसाठी एसटी ही अत्यावश्यक सार्वजनिक वाहतूक सेवा असून, सेवा अबाधित राखत आर्थिक संतुलन कायम ठेवणे हे महामंडळासमोरील प्रमुख आव्हान असल्याचेही मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

# श्री कानिफनाथ वारकरी शिक्षण संस्था उद्घाटनानिमित्त २२ मे रोजी गोळेगांव येथे हभप इंदुरीकर महाराजांचे किर्तन

गेवराई (प्रतिनिधी) :- गेवराई तालुक्यातील श्री कानिफनाथ गड, मौजे गोळेगाव येथे ख्यातनाम मृदंग वादक - हभप अंकुश महाराज काळे यांनी बालकांना सुसंस्कारित होण्यासाठी वारकरी शिक्षण संस्था सुरू केली असून संस्थेच्या उद्घाटनानिमित्त शुक्रवार दि.२२ मे रोजी रात्री ८ ते १० या वेळेत समाज प्रबोधनकार हभप निवृत्ती महाराज देशमुख (इंदुरीकर) यांचे हरिकिर्तन होणार आहे. तसेच शनिवार दि.२३ मे रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत हभप मधुसुधन महाराज गवारे (माऊली संस्थान, राजापूर फाटा) यांचे काल्याचे किर्तन व त्यानंतर महाप्रसादाचे वाटप होऊन कार्यक्रमाची सांगता होणार आहे.

श्री कानिफनाथ गड मौजे गोळेगाव याठिकाणी सुरू होत असलेल्या वारकरी शिक्षण संस्थेत शुक्रवार दि.०१ मे ते शनिवार दि.२३ मे या कालावधीत मोफत बालसंस्कार शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. मृदंग अलंकार गुरूवर्य श्री विष्णूपंत लोंढे गुरूजी यांच्या गुरूपूजन सोहळ्यानिमित्त या भव्यदिव्य अशा कार्यक्रमाचे आयोजन संस्थेचे अध्यक्ष - हभप अंकुश महाराज काळे यांनी केले असून या उद्घाटन कार्यक्रमाला महाराष्ट्रातील ख्यातनाम किर्तनकार, संत-महंत तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी आवर्जून उपस्थित राहणार आहेत. तरी या कार्यक्रमाचा लाभ गेवराई तालुक्यातील



महिला - पुरूष मंडळी व युवकांनी घ्यावा असे आवाहन मृदंग विशारद - अंकुश महाराज काळे व प्रसिद्ध बालकिर्तनकार चैतन्य महाराज राऊत यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकारद्वारे केले आहे.

# समाधान महाराज शर्मा यांची शिवमहापुराण कथा

## पहिल्या दिवशी श्रोते मंत्रमुग्ध

बीड (प्रतिनिधी)

राष्ट्रीय कीर्तनकार तथा सुप्रसिद्ध शिवपुराण कथाकार भावरत्न ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांच्या सुश्राव्य वाणीतून श्री शिवमहापुराण कथेला सोमवार दि.१८ मे २०२६ पासून बीड येथे प्रारंभ झाला आहे. पहिल्या दिवशी भाविकांची मोठी गर्दी झाली.बीड शहरातील सावता माळी चौक, श्रीकृष्ण मंदिराजवळ आयोजित कथेसाठी भव्य मंडप व व्यासपीठ उभारण्यात आले आहे.कथा वेळ दररोज सायंकाळी ७.०० ते १०.०० वाजेपर्यंत आहे. भाविकांनी या कथेचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.



# धाराशिव : विधान परिषद स्थानिक प्राधिकरण मतदारसंघ निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर

धाराशिव (प्रतिनिधी)

भारत निवडणूक आयोगाने, ( उस्मानाबाद-लातूर-बीड )स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद द्वैवार्षिक निवडणूक-२०२६ कार्यक्रमाची घोषणा केली आहे. याबाबत निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी धाराशिव यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे माहिती दिली.निवडणुकीची अधिसूचना २५ मे २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार असून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत १ जून २०२६ आहे. अर्जांची छाननी २ जून रोजी होणार असून उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख ४ जून २०२६ निश्चित करण्यात आली आहे.मतदान १८ जून २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत होणार आहे. मतमोजणी २२ जून २०२६ रोजी होईल. निवडणूक प्रक्रिया २५ जून २०२६ रोजी पूर्ण करण्यात येणार आहे.भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार निवडणूक कार्यक्रम जाहीर होताच आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी किर्ती किरण पुजार यांनी दिली.

# युवक-युवतींना प्रशासनासोबत काम करण्याची आणि महाराष्ट्राच्या विकास प्रक्रियेत प्रत्यक्ष सहभागी होण्याची सुवर्णसंधी - मुख्यमंत्री

मुंबई (प्रतिनिधी)

कल्पकता, नेतृत्वगुण आणि नव्या विचारांना दिशा देणाऱ्या 'मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रम २०२६' साठी अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. महाराष्ट्र शासनासोबत प्रत्यक्ष काम करत राज्यासमोरील महत्त्वाचे प्रश्न समजून घेणे, तंत्रज्ञान आणि नवकल्पनांच्या माध्यमातून उपाय शोधणे तसेच जिल्हास्तरावर विविध विकास उपक्रमांमध्ये सहभागी होण्याची ही मोठी संधी आहे.

पूर्णपणे पारदर्शक आणि गुणवत्तेच्या आधारे होणाऱ्या या निवड प्रक्रियेत समाजाप्रती योगदान देण्याची इच्छा असलेल्या सर्व युवक-युवतींनी सहभागी व्हावे.अर्ज करण्याची अंतिम तारीख : २७ मे २०२६ आहे.

# शिरूर कासार येथील 'आयुष्मान आरोग्य मंदिर' अंधारात..!

शिरूर कासार /प्रशांत बाफना

शासनाने ग्रामीण भागातील जनतेला गावातच तातडीने आरोग्य सेवा मिळाव्यात म्हणून ठीक ठिकाणी जिल्हा परिषद आरोग्य विभाग अंतर्गत करोडो रुपये खर्च करून आरोग्य उपकेंद्रे उभारली आहेत. तसेच याच उपकेंद्राचे काही वर्षांपूर्वी पंतप्रधान यांच्या संकल्पनेतून उपकेंद्रांचे नामकरण 'आयुष्मान आरोग्य मंदिर' केले. मात्र, शिरूर कासार तालुक्यातील उपकेंद्रात सध्या मूलभूत सुविधांचा पुरता बोजवारा उडाला आहे. या केंद्रात लाईट नाही, पंखे नाहीत आणि पिण्याच्या पाण्याचीही कोणतीही सोय नाही. कडाक्याच्या उन्हात रुग्णांना आणि येथील वैद्यकीय कर्मचाऱ्यांना नरकयातना सहन कराव्या लागत आहेत.

वर्षभरापासून कोंडवाड्यासारखी अवस्था..!वरिष्ठांचे दुर्लक्ष..?

उपकेंद्र संचालिका सारूक अश्विनी यांनी प्रशासनाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आणला आहे. त्यांनी सांगितले की, मी गेल्या एक वर्षापासून या उपकेंद्रात रुजू झालेली आहे. मी आल्यापासून येथील परिस्थिती अशीच बिकट आहे. या सर्व गंभीर बाबींची आणि सुविधांच्या अभावाची माहिती मी लेखी व तोंडी स्वरूपात आमच्या वरिष्ठांना वारंवार दिलेली आहे. परंतु, अद्यापही प्रशासनाकडून कोणतीही सुविधा पुरवण्यात आलेली नाही. संचालिकांच्या या खुलाशामुळे आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी ग्रामीण आरोग्याबाबत किती उदासीन आहेत, हे स्पष्ट झाले आहे.

रुग्ण आणि गरोदर महिलांची मोठी फरफट अंधार आणि उकाडा..!

उपकेंद्रात वीज नसल्यामुळे संपूर्ण इमारतीत अंधार असतो. पंखे बंद असल्याने उपचारासाठी येणारे लहान मुले, वृद्ध आणि गरोदर महिलांना उकाड्याचा तीव्र त्रास सहन करावा लागतो.




**प्रशासनाविरोधात ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप..!**
शासनाने कोट्यवधी रुपये खर्च करून इमारती उभारल्या आणि नावे बदलली. मात्र, वर्षभर तक्रार करूनही एका तालुक्याच्या उपकेंद्राला वीज आणि पाणी देता येत नसेल, तर या 'आरोग्य मंदिराचा' उपयोग काय..? असा संतप्त सवाल स्थानिक ग्रामस्थ विचारत आहेत. या गंभीर समस्येकडे जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी तात्काळ लक्ष देऊन येथील वीज, पंखे आणि पाण्याची समस्या त्वरित सोडवावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे

पाण्यासाठी भटकंती..!

केंद्रात पिण्याच्या पाण्याची साधी व्यवस्था नसल्याने रुग्णांना औषध घेण्यासाठी बाहेरून पाणी विकत आणावे लागते किंवा दूरवरून पाणी शोधावे लागते.उपचारात अडथळे..?

# जुन्नर तालुक्यात भीषण एसटी अपघात

## चालकासह दोघांचा मृत्यू, २५ प्रवासी जखमी

**पुणे : पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात सोमवारी भीषण एसटी बस अपघाताची घटना घडली. कल्याण-अहिल्यानगर महामार्गावरील बेल्हे-गुंजाळवाडी परिसरात झालेल्या या अपघातात एसटी चालकासह एका प्रवाशाचा मृत्यू झाला असून सुमारे २५ प्रवासी जखमी झाले आहेत. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित एसटी बस कल्याण-अहिल्यानगर महामार्गावरून प्रवाशांना घेऊन जात होती. यावेळी समोरून जाणाऱ्या चारचाकी वाहनाला ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यामुळे एसटी बस रस्त्यालगतच्या खोल खड्ड्यात पलटी झाली.

अपघात इतका भीषण होता की चालकासह एका प्रवाशाचा जागीच मृत्यू झाला. तसेच बसमधील अन्य २५ प्रवासी गंभीर व किरकोळ जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले.




स्थानिकांच्या मदतीने जखमी प्रवाशांना तातडीने आळेफाटा परिसरातील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. काही जखमींची प्रकृती गंभीर असल्याची माहिती मिळत आहे. अपघातात चालकही गंभीर जखमी झाला होता. मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात येत आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. अपघाताचे नेमके कारण आणि पुढील तपास पोलीस प्रशासनाकडून सुरू आहे.

# हिम्मत असेलतर मोदी सरकारवर दबाव टाकुन दिल्लीत गोहत्या कायदा करण्यासाठी


## हिंदुत्ववादी नेत्यांनी मागणी करावी उगाच दोन समाजामध्ये तेढ निर्माण करुन गल्लीत गोंधळ घालु नये - इलियास इनामदार

बीड प्रतिनिधि: गाई ही हिंदू बांधवांची आस्था श्रध्दा आहे हिंदू बांधव गाईला देवीचे रुप मानतात कोणाच्याही धार्मिक भावना दुखवल्या जावू नये म्हणून देशाचे पतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी गाईला राष्ट्रीयपशु घोषित करावे व गोहत्या कायदा देशपातळीवर लागू करावा.

गोहत्या थांबवायची असेल तर फक्त गोरगरीब शेतकरी व खाटकावर कार्यवाही करून कसे चालणार, गाई बैल विकणा-या व्यापा-यांवर पण कार्यवाही व्हायला पाहिजे गाई बैल पकडून देणारे व नंतर मांडवली करून हफते खाणा-या डुपलीकेट गोरक्षकांवर पण मकोका लावायला हवे, छावन्या मधून जनावरे गायब करून विकणा-यावर किंवा छावन्याध्ये गाईंचे हाल हाल करून उपाशी पोटी मारणा-यांवर पण मकोका लावावा व राज्यातच नव्हे संपूर्ण देशात गोहत्या कायदा करून भारतामध्ये हिंदू मालकांचे बीफ कत्तलखाने कंपन्यामध्ये गोहत्या करुन गाईचे मटन विदेशात निर्यात केले जाते अशा बीफ कंपन्यांवर पण सुद्धा बंदी घालून कायदेशीर कार्यवाही करावी.

हिम्मत असेलतर मोदी सरकारवर दबाव टाकुन दिल्लीत गोहत्या कायदा करण्यासाठी हिंदुत्ववादी नेत्यांनी मागणी करावी उगाच दोन समाजामध्ये तेढ निर्माण करुन गावं गल्लीत मोर्चे काढून गोंधळ घालु नये व स्वताच्या राजकारणासाठी आम जनतेला वेठीस धरु नये असेल हिम्मत तर आमच्या सोबत हिंदुत्ववादी नेते करणार का? नरेंद्र मोदीजी व अमित शाह यांच्याकडे मागणी व केंद्र सरकारवर दबाव टाकणार का? का आपला असला तर बबडया आणि दुस-याचं कारटं समजतात असे तर नव्हे ना.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना यापुर्वी सामाजिक कार्यकर्ते ड. इलियास इनामदार यांनी ऑक्टोबर २०२४ ला व मार्च २०२५ ला निवेदनाद्वारे मागणी



केली होती परंतु आज तारखेपर्यंत पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेबांनी याविषयी कसलीच हालचाल केलेली दिसत नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना या विषयी पुन्हा निवेदन पाठवणार आहे अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते ड. इलियास इनामदार यांनी प्रसार माध्यमांना दिली आहे.

# मुस्लिमांनी जनगणना प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा : नगर सेवक शाहरुख खा पठाण

गेवराई (प्रतिनिधी):- नगर सेवक शाहरुख खा पठाण यांनी महाराष्ट्रातील मुस्लिम समाजाला आवाहन केले आहे की त्यांनी जनगणना प्रक्रियेत पूर्ण जबाबदारीने सहभागी व्हावे आणि मागितलेली माहिती अचूकपणे द्यावी. नगर सेवक शाहरुख खा पठाण यांनी म्हटले आहे की देशव्यापी जनगणना २०२६ ला सुरुवात झाली आहे. जनगणना ही केवळ सरकारची माहिती गोळा करण्याची प्रक्रिया नसून ती समाजाच्या भविष्यासाठी, संसाधनांच्या वाटपासाठी, विकास योजनांसाठी, शिक्षण, रोजगार, आरोग्य आणि मूलभूत सुविधांसाठी अत्यंत महत्त्वाची असते. त्यामुळे या प्रक्रियेत नियमितपणे सहभागी होणे आणि आवश्यक माहिती नोंदवणे अत्यावश्यक आहे.

यामध्ये कोणतीही निष्काळजीपणा किंवा दुर्लक्ष होऊ नये.नगर सेवक शाहरुख खा पठाण यांनी स्पष्ट केले की लोकसंख्येची अचूक नोंद झाल्यास त्यानुसार शाळा, महाविद्यालये आणि



रुग्णालये उभारली जातात. तसेच रस्ते, पाणी, वीज आणि इतर सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. रोजगार आणि कल्याणकारी योजनांचाही निर्णय लोकसंख्येच्या आधारे घेतला जातो.

नगर सेवक शाहरुख खा पठाण यांनी समाजाला इशारा दिला आहे की जनगणनेत सहभाग न घेणे किंवा आवश्यक माहिती नोंदवून न देणे यामुळे गंभीर नुकसान होऊ शकते. यामुळे आपल्या समाजाची खरी लोकसंख्या सरकारी नोंदीत दिसणार नाही, शासकीय सुविधा आणि विकास योजनांमध्ये घट होऊ शकते, आपल्या भागांच्या गरजा दुर्लक्षित राहू शकतात आणि भविष्यातील पिढ्यांचे हक्क प्रभावित होऊ शकतात.

त्यामुळे महाराष्ट्रातील सर्व मुस्लिम बांधवांना जोरदार आवाहन करण्यात आले आहे की त्यांनी स्वतः जनगणनेत सहभागी व्हावे. पहिल्या टप्प्यात घरे, दुकाने आणि इमारतींची गणना केली जाणार आहे. तसेच आपल्या नातेवाईकांना, शेजाऱ्यांना आणि सर्वसामान्य जनतेलाही जनगणनेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे आणि आवश्यक माहिती जबाबदारीने नोंदवून द्यावी.



बीड (प्रतिनिधी) - महाराष्ट्र राज्य वक्फ़ महामंडळाचे चेअरमन तथा राज्यमंत्री दर्जा असलेले समीर काज़ी यांच्या मुलीच्या लग्नाचा निरोप समारंभ नुकताच दिनांक १५ मे २०२६ शुक्रवार रोजी औरंगाबाद/छत्रपती संभाजीनगर येथील आयकॉन सेलिब्रेशन फंक्शन हॉलमध्ये पार पडला. यावेळी त्यांना वासेख़ युसूफ़ शेख यांनी शुभेच्छा दिल्या. तसेच याच कार्यक्रमात महाराष्ट्राचे इतर मागास बहुजन कल्याण (जइउ), दुग्धव्यवसाय विकास आणि अपारंपारिक ऊर्जा (अक्षय ऊर्जा) खात्याचे कॅबिनेट मंत्री अतुल सावे यांची भेट घेऊन उच्च शिक्षणावर चर्चा केली. यावेळी उभयतात मनसोक्त बोलणे झाले.

# गेवराई नगर परिषदेचे कंत्राटी कामगार शहराचा कणा

## किमान वेतन कष्टकरी कामगारांचा मूलभूत हक्कच - भाजपा नेते बाळराजे पवार

गेवराई : (प्रतिनिधी):-गेवराई शहराच्या सर्वांगीण विकासात पाणी आणि स्वच्छता हे महत्वाचे घटक असून, कंत्राटी सफाई कामगार शहरातील स्वच्छतेचा कणा आहे. त्यांच्यामुळेच शहरातील घाण साफ होते. सगळेच कामगार इमानेइतबारे काम करून, शहरातील नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेत आहेत. म्हणूनच, किमान वेतन अधिनियमानुसार त्यांना पगार देण्याचा निर्णय घेतला. आम्ही कामगारांवर उपकार केले नाहीत. गोरगरीब कामगारांच्या सुखदुःखात आम्ही कायम सोबत आहोत. तुम्ही प्रमाणीकपणे काम करा, तुमच्यावर कधीच अन्याय होऊ देणार नाही. अशी भावना भारतीय जनता पक्षाचे नेते बाळराजे पवार यांनी येथे बोलताना व्यक्त केली आहे.

गेवराई नगर परिषदेच्या कंत्राटी कामगारांच्या वतीने, शनिवार ता. १६ मे रोजी सकाळी अकरा वाजता भारतीय जनता पक्ष कार्यालयात आयोजित सत्कार समारंभात ते बोलत होते. व्यासपीठावर नप उपाध्यक्ष ड. घुंबार्डे जिजा, गटनेते ड राजेंद्र राक्षसभूवनकर, माजी सरपंच दिलीप मोरे मामा, सभापती महेश सौंदरमल, सभापती बद्दुशेठ, नगरसेवक अप्पासाहेब कानगुडे, नगरसेवक राजेश टाक, माजी सभापती जिजा खंडागळे, माजी नगराध्यक्ष सुशील जवंजाळ, माजी नगरसेवक भरत गायकवाड यांची उपस्थिती होती.

गेवराई नगर परिषदेच्या कंत्राटी कामगारांना किमान वेतन अधिनियमानुसार पगार देण्याची मागणी भारतीय जनता पक्षाच्या वतीने बाळराजे पवार यांनी नप प्रशासनाकडे करण्यात आली होती. नगर परिषदेवर सत्ता स्थापन होताच, पवार यांनी कामगार वेतनाच्या संदर्भात पाठपुरावा केल्याने, गेल्या काही महिन्यांपासून नपच्या कंत्राटी कामगारांना किमान वेतन दिले जात आहे. कामगारांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. कामगारांच्या वतीने शनिवार ता. १६ रोजी बाळराजे पवार यांचा जाहीर सत्कार करून कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. महिला कामगारांनी पवारांचे



शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. पाणी पुरवठा, घंटा गाडी, स्वच्छता विभागाच्या कामगारांनी पवार यांचे स्वागत करून आनंद व्यक्त केला.

यावेळी बोलताना पवार म्हणाले की, गेवराई चे कामगार शहराचे भूमिपुत्र आहेत. त्यांच्याच बळावर शहरातील स्वच्छता मोहीम यशस्वी होऊ शकली. ते इमानदारी काम करत आलेत. त्यामुळे त्यांच्या घामाचा मोबदला म्हणून त्यांच्यासाठी किमान वेतनाचा विषय लावून धरला होता. त्याला यश आले असून, कामगारांच्या हक्कासाठी झटणारी, गेवराई नगर परिषद ही, मराठवाड्यातली पहिली नगरपालिका असणार आहे. ही बाब मनाला समाधान देणारी आहे. पाणी आणि स्वच्छता हे महत्वाचे स्वच्छता दूत असून, कंत्राटी सफाई कामगार शहरातील स्वच्छतेचा कणा आहेत. त्यांच्यामुळेच शहरातील घाण साफ होते. सगळे कामगार इमानेइतबारे काम करून, शहरातील नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेत आहेत. याचा आनंद असून, त्यांना त्या कामाचा मोबदला मिळालाच पाहिजे. यापुढे ही, त्यांचे हित लक्षात घेऊन नपचे नगराध्यक्ष, नगरसेवक काम करतील. तुम्ही कुठेही कमी पडू नका, आम्ही तुमच्या पाठीशी आहोत. अशी अपेक्षा भाजपा नेते बाळराजे पवार यांनी शेवटी बोलताना व्यक्त केली. यावेळी ड. राजेंद्र राक्षसभुवनकर, महेश सौंदरमल यांची भाषणे झाली. यावेळी मुन्ना शेठ, विष्णुपंत आतकरे, भरतजी गायकवाड, कृष्णा भैया पाटोळे ,आखेब काझी, फाहाद चाऊस , जावेद पठाण ,शौकत पठाण संतोष राठोड, राजू पठाण, राम चोरमले,गणेश सुरडकर संजय आंधळे , श्रीराम घाटूळ, मुजायद टेलर , उमेश साकळे, लक्ष्मण चव्हाण, यांच्यासह नगर परिषदेचे कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार सुभाष सुतार यांनी केले.

# रामपूर बंधाऱ्याजवळ दु:खद घटना; कुटुंबीयांचा आक्रोश

## १८ तासांच्या अथक शोधमोहीमेनंतर दिनेश जाधवचा मृतदेह सापडला; प्रवरा परिसरात शोककळा

अहिल्यानगर/ प्रशांत बाफना : राहुरी तालुक्यातील रामपूर येथील प्रवरा नदीवरील बंधाऱ्याजवळ शनिवारी दुपारी घडलेल्या दुर्दैवी घटनेत १४ वर्षीय दिनेश नितीन जाधव या मुलाचा पाण्याच्या प्रवाहात वाहून जाऊन मृत्यू झाला. तब्बल १८ तास चाललेल्या थरारक शोधमोहीमेनंतर रविवारी सकाळी अकराच्या सुमारास त्याचा मृतदेह शोधण्यात बचाव पथकाला यश आले. या घटनेमुळे संपूर्ण प्रवरा परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

गोंधवणी येथील दिनेश हा उन्हाळी सुट्टीनिमित्त आई-वडील व लहान भावासह रामपूर फाटा येथे आजोबा इंद्रभान बोरुडे यांच्या घरी आला होता. शनिवारी दुपारी कुटुंबीयांसोबत प्रवरा नदीपात्रात पोहण्यासाठी गेलेल्या दिनेशला पाण्याच्या प्रवाहाचा अंदाज न आल्याने तो अचानक वेगवान पाण्यात ओढला गेला. काही क्षणांतच तो कुटुंबीयांच्या नजरेआड झाला.

घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी मदतीसाठी धाव घेत आरडाओरडा केला; मात्र पाण्याचा वेग प्रचंड असल्याने कोणालाही त्याच्यापर्यंत पोहोचता आले नाही. घटनेची माहिती मिळताच परिसरात एकच खळबळ उडाली.

अहिल्यानगर जिल्हा अग्निशमन कार्यालयाकडून माहिती



मिळाल्यानंतर शिर्डी, राहाता व श्रीरामपूर नगरपालिकेचे अग्निशमन दल, आपत्ती व्यवस्थापन पथक तसेच आपदा मित्रांनी घटनास्थळी धाव घेत युद्धपातळीवर शोधकार्य सुरू केले. नदीपात्रातील खोल पाणी, वाढता प्रवाह आणि अंधार यामुळे शोधकार्यात मोठ्या अडचणी निर्माण होत होत्या. रात्रभर प्रयत्न सुरू ठेवूनही अंधारामुळे बचावकार्य थांबवावे लागले.

रविवारी सकाळी पुन्हा बोटींच्या सहाय्याने शोधमोहीम सुरू करण्यात आली. अखेर सकाळी अकराच्या सुमारास दिनेशचा मृतदेह सापडताच कुटुंबीयांचा आक्रोश उसळला. उपस्थित ग्रामस्थांच्या डोळ्यांतही अश्रू तरळले.या शोधमोहीमेत साईनंद भामरे, तेजस वाणी, शुभम साठे, ऋषिकेश सदाफळ, प्रशांत डांगे, अमोल बनसोडे, मुज्जू शेख, राहुल जाधव, रामराजे गायकवाड तसेच ईआरटी टीम संगमनेर आणि स्थानिक ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग घेतला.दरम्यान, या घटनेनंतर प्रवरा नदीवरील बंधाऱ्याजवळ सुरक्षा उपाययोजनांचा अभाव असल्याबद्दल नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. धोकादायक ठिकाणी संरक्षक जाळी, इशारा फलक आणि कायमस्वरूपी बचाव यंत्रणा उभारण्याची मागणी जोर धरत आहे.


हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अँण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# युवकांनी नोकरी शोधणारे नव्हे तर रोजगार निर्माण करणारे शेतकरी उद्योजक बनावे-आ.सुरेश धस

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) राज्याच्या राजकारणात विकासाभिमुख, अभ्यासू आणि सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवणारे लोकनेते, मराठवाडा भूषण आमदार सुरेश आण्णा धस यांनी आता ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा समजल्या जाणाऱ्या दुग्ध व्यवसायाला नवी दिशा देण्याचा संकल्प हाती घेतला आहे. शेतकरी, दुग्ध उत्पादक, महिला बचत गट आणि बेरोजगार युवकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी दुध व्यवसाय हा अत्यंत परिणामकारक पर्याय ठरू शकतो, या दूरदृष्टीतून आ. धस यांनी दुग्ध व्यवसायाच्या आधुनिकीकरणासाठी विविध महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यास सुरुवात केली आहे.

आज ग्रामीण भागातील शेतकरी वाढत्या उत्पादन खर्चामुळे आणि शेतीतील अनिश्चिततेमुळे आर्थिक अडचणींचा सामना करत आहेत. अवकाळी पाऊस, दुष्काळ, पिकांचे घटते दर आणि वाढलेले कृषी खर्च यामुळे शेतीवर पूर्णपणे अवलंबून राहणे कठीण होत आहे. अशा परिस्थितीत दूध व्यवसाय हा दररोज आर्थिक उत्पन्न देणारा आणि शेतकऱ्यांना स्थैर्य मिळवून देणारा व्यवसाय ठरू शकतो, असा विश्वास आ. सुरेश आण्णा धस यांनी व्यक्त केला आहे.

त्यांच्या मार्गदर्शनाखाली आष्टी तालुक्यासह परिसरातील अनेक गावांमध्ये आधुनिक दुग्ध व्यवसायाविषयी जनजागृती केली जात आहे. दूध उत्पादन वाढविण्यासाठी वैज्ञानिक पद्धतींचा वापर, दर्जेदार जनावरांचे संगोपन, पशुखाद्य व्यवस्थापन, पशुरोग नियंत्रण, थंड साखळी व्यवस्था, दूध संकलन केंद्रांची उभारणी आणि आधुनिक गोठा व्यवस्थापन यावर विशेष भर दिला जात आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांनी पारंपरिक पद्धतींपासून बाहेर पडून आधुनिक आणि व्यावसायिक दृष्टिकोन स्वीकारणे आवश्यक असल्याचे आ. धस सातत्याने सांगत आहेत.

विशेष म्हणजे आ. धस यांनी स्वतः आष्टी तालुक्यात अत्याधुनिक आणि वैज्ञानिक पद्धतीने चालणारा मोठा गाय गोठा उभारून इतर शेतकऱ्यांसमोर आदर्श निर्माण केला आहे. त्या ठिकाणी गाई आणि कालवडींचे संगोपन अत्यंत शास्त्रशुद्ध पद्धतीने केले जाते. गोठ्यात स्वच्छता, संतुलित आहार, आधुनिक दुग्ध व्यवस्थापन, मुक्त गोठा संकल्पना आणि उच्च प्रतीचे पशुसंवर्धन यावर विशेष भर देण्यात आला आहे. त्यामुळे अनेक शेतकरी प्रत्यक्ष पाहणी करून आधुनिक दुग्ध व्यवसायाची माहिती घेत आहेत.

यावेळी मार्गदर्शन करताना आमदार सुरेश धस म्हणाले, शेतीला पर्याय म्हणून दूध उत्पादन हा सर्वात चांगला व्यवसाय आहे. युवकांनी नोकरीच्या मागे न लागता शेती उद्योजक बनले पाहिजे. आज काळ बदलला आहे. पारंपरिक पद्धतीऐवजी तंत्रज्ञानाचा वापर करून व्यवसाय करणे गरजेचे झाले आहे. योग्य नियोजन, योग्य व्यवस्थापन आणि दर्जेदार जनावरे यांच्या माध्यमातून दुग्ध व्यवसायात मोठ्या प्रमाणावर आर्थिक प्रगती करता येऊ शकते.




ते पुढे म्हणाले की, दूध उत्पादकांनी जागरूक राहिले पाहिजे. पंजाबमधून येणाऱ्या हलक्या दर्जाच्या गायी खरेदी करू नयेत. अनेक वेळा अशा गायींमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होते. दर्जेदार आणि दूध उत्पादनक्षम जनावरांची निवड करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. तसेच कालवड संगोपनाकडेही विशेष लक्ष दिले पाहिजे. योग्य पद्धतीने संगोपन केल्यास कालवडींपासून भविष्यात मोठ्या प्रमाणावर आर्थिक लाभ मिळू शकतो.

पशुखाद्य व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की, मुरघास निर्मिती ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. परंतु चुकीच्या पद्धतीने तयार केलेल्या मुरघासामुळे गाईंना स्तनदाहासारखे गंभीर आजार होतात. त्यामुळे यापुढे भोतातील मुरघास वापरू नये. जमिनीत तीन ताली खोदून गावठी कडबा, तूर, सोयाबीन आदींचा वापर करून योग्य पद्धतीने मुरघास तयार करावा. गाईंना वर्षभर संतुलित आहार देणे आवश्यक आहे. फक्त पोट भरण्यासाठी चारा देऊ नये. ८० टक्के मुरघास आणि २० टक्के सोयाबीन सरकी असा संतुलित खुराक द्यावा.

आधुनिक पशुसंवर्धन तंत्रज्ञानावर भर देताना आ. धस म्हणाले, दर्जेदार सिमेनचा वापर करणे अत्यंत आवश्यक आहे. डब्ल्यूडब्ल्यूएस, एबीएस, आरमाडा, ऑस्कर किंवा रँग्लर यांसारख्या उच्च दर्जाच्या सिमेनचा वापर केल्यास चांगल्या प्रतीच्या गायी तयार होतात. जगात सर्वाधिक दूध उत्पादन होलस्टीन फ्रिजर जातीच्या गायींपासून घेतले जाते. त्यामुळे शेतकऱ्यांनी वैज्ञानिक पद्धतीने पशुसंवर्धनाकडे लक्ष दिले पाहिजे.

त्यांनी मुक्त गोठा संकल्पनेलाही प्रोत्साहन दिले असून सोडबांध पद्धत बंद करून गाईंना मोकळेपणाने फिरता येईल असे गोठे उभारले पाहिजेत. त्यामुळे जनावरांचे आरोग्य चांगले राहते आणि दूध उत्पादनातही वाढ होते, असे त्यांनी स्पष्ट केले.

ग्रामीण भागातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी दुग्ध व्यवसाय मोठे माध्यम ठरू शकते, असे सांगताना आ. धस यांनी महिला बचत गटांनी दूध व्यवसायात सहभागी व्हावे, असे आवाहन केले. महिलांनी घरबसल्या दुग्ध व्यवसायातून आर्थिक स्वावलंबन मिळवावे आणि कुटुंबाच्या उत्पन्नात हातभार लावावा, अशी त्यांची भूमिका आहे.

युवकांना प्रोत्साहन देण्यासाठी आगामी काळात गाय तुमची - कालवड आमची ही महत्त्वाकांक्षी योजना सुरू करण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली. तसेच शासनाच्या माध्यमातून पाच गाईंच्या गोठ्यासाठी सुमारे अकरा लाख रुपयांची योजना लवकरच सुरू होणार असून युवकांनी या योजनेचा लाभ घेऊन दुग्ध व्यवसायात उतरावे, असे आवाहनही त्यांनी केले.

आष्टी तालुक्यासह परिसरातील अनेक गावांमध्ये दूध व्यवसायामुळे ग्रामीण अर्थचक्र अधिक मजबूत होत आहे. अनेक कुटुंबांना दररोज आर्थिक उत्पन्न मिळत असल्याने त्यांचे जीवनमान उंचावत आहे. शेतीसोबत पूरक व्यवसाय म्हणून दुग्ध व्यवसाय स्वीकारल्याने ग्रामीण भागात रोजगारनिर्मितीलाही चालना मिळत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील स्थलांतर कमी होऊन स्थानिक स्तरावर रोजगाराच्या संधी निर्माण होत असल्याचे सकारात्मक चित्र दिसून येत आहे.

राजकारणात विकासकामांची वेगळी ओळख निर्माण करणारे आमदार सुरेश आण्णा धस हे केवळ राजकीय पातळीवरच नव्हे तर सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक क्षेत्रातही सक्रियपणे काम करत आहेत. सामान्य शेतकरी, कष्टकरी आणि ग्रामीण युवकांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवून आणण्याचा त्यांचा सातत्यपूर्ण प्रयत्न आता दुग्ध व्यवसायाच्या माध्यमातून अधिक प्रभावीपणे समोर येत आहे. दूध व्यवसायाच्या माध्यमातून ग्रामीण भागात आर्थिक क्रांती घडवून आणण्याचा त्यांचा संकल्प अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत असून, ग्रामीण विकासासाठी शेतीसोबत दुग्ध व्यवसाय हाच भविष्यातील मजबूत आधार हा संदेश त्यांनी आपल्या कार्यातून प्रत्यक्षात उतरविला आहे.



## लोकमित्र राज्यस्तरीय गौरव २०२६ पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन

प्रस्ताव स्वीकारण्याची अंतिम तारीख १जून; वितरण समारंभ २०जून ला होणार

बीड (प्रतिनिधी) - सा. युवा लोकमित्र कडून पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन करण्यात आले असून प्रस्ताव स्विकारण्याची अंतिम तारीख १जून असून पुरस्कार वितरण समारंभ २०जून रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे.

समाजसेवा, शिक्षण, उद्योग, वैद्यकीय, प्रशासकीय, क्रीडा, पत्रकारिता इत्यादी क्षेत्रांमध्ये विशेष कार्य करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.पत्रकारिता क्षेत्रात आपल्या परखड आणि सडेतोड लेखणी द्वारे आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणारे 'साप्ताहिक युवा लोकमित्र' चा वर्धापन दिन येत्या २० जून २०२६ रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या निमित्ताने विविध क्षेत्रांत निःस्वार्थ व विशेष उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना लोकमित्र राज्यस्तरीय गौरव पुरस्कार - २०२६-२७ वितरीत करून गौरविण्यात येणार आहे. याविषयी बोलताना संपादक तथा पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष शेख ताहेर,यांनी म्हटले की, समाज आणि राष्ट्राप्रती समर्पित भावनेने कार्य करणाऱ्या घटकांविषधी कृतज्ञता व्यक्त करणे, हा या पुरस्कारामागील मुख्य हेतू आहे. समाजाच्या जडणघडणीत योगदान देणाऱ्या अशा व्यक्तींना युवा लोकमित्र परिवाराच्या वतीने या सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते सन्मानित केले जाईल. प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख १जून २०२६ आहे.

या पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याकरिता निवड समितीचे पदाधिकारी शेख ताहेर - ९३७०९३७०८१, शेख आयेशा - ९३२२१२९४९१, शेख युनूस - ९८२२५१०२९२,सय्यद इलयास - ९९२२३५५०३१,शेख अब्दुल रहेमान - ९७६३७६९३९५, गुलाम साकीब - ९२२६३६८४९३, हकीम मनीयार - ८३२९५७२६०४,कलाम सर - ८८५५०४५४४६,डॉ.शेख नासेर - ९८६०३३९२६४, शेख वसीम - ९०२८९७९९९१ यांच्याशी संपर्क साधावा किंवा सा. युवा लोकमित्र कार्यालय, बार्शी नाका चौक, बीड. येथे प्रत्यक्ष भेट द्यावी असे आवाहन निवड समितीकडून करण्यात आले आहे.

# अजिमोद्दिन शेख पद्मपाणि राज्यस्तरीय उत्कृष्ट सामाजिक कार्य पुरस्काराने सन्मानित

आष्टी - (प्रतिनिधी) २६ नोव्हेंबर संविधान दिनाच्या अनुषंगाने पद्मपाणि राष्ट्रीय-राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यात शेतकरी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते अजिमोद्दिन शेख यांना पद्मपाणि उत्कृष्ट सामाजिक कार्य २०२६ राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे झालेल्या या भव्य कार्यक्रमात पोलिस निरीक्षक पल्लवी जाधव , पोलीस निरीक्षक सुभाष सानप (नाशिक) यांच्या हस्ते सन्मानपत्र व मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. अनेक व विविध प्रकारे आंदोलने, उपोषणे, माहिती अधिकार,निवेदने आणि जन आंदोलनाच्या माध्यमातून नागरिकांचे प्रश्न प्रशासनापर्यंत पोहोचून अनेक प्रश्न मार्गी




लावले आहेत. सामाजिक बांधिलकी जपत भ्रष्टाचाराविरोधातही त्यांनी आवाज उठवला आणि भ्रष्ट कामात कारवाही करण्यात यश मिळवले त्यांच्या या धाडसी कार्याची समाजसेवेची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला.

पद्मपाणि हा मानाचा पुरस्कार प्रदान केल्याबद्दल अजिमोद्दिन शेख यांनी संस्थापक अध्यक्ष दिलीप तरकसे व त्यांच्या पुर्ण टिमचे आभार मानले. पुरस्कार स्वीकारताना शेख यांच्यासोबत त्यांची पत्नी खातून शेख, शेतकरी संघटनेचे रामप्रसाद गाडे, रघूनाथ नावडे, संजय खटके, प्रा. राम बोडखे, प्रा. हेमाली बोडखे, पत्रकार रहेमान सय्यद यांची उपस्थिती होती. या पुरस्काराबद्दल विविध स्तरांतील शुभचिंतकांकडून अजिमोद्दिन शेख यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# डेंग्यूविरोधात जामखेड प्राथमिक आरोग्य केंद्राची जनजागृती मोहीम

जामखेड । प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील जामखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने १६ मे राष्ट्रीय डेंग्यू दिनानिमित्त जनजागृती मोहिमेचे आयोजन करण्यात आले. डेंग्यूसारख्या डासजन्य आजाराबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी विविध ठिकाणी जनजागृती करण्यात आली.

वैद्यकीय अधिकारी डॉ. सफदर खान यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या मोहिमेत आर. आर. घुले, स्वाती वाघ, जी. पी. दांडेगावकर (एल.एस.ओ.), आदिंसह आरोग्य सेविक, आरोग्य सेवक, आरोग्य सहाय्यक, डाटा ऑपरेटर तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रातील



**मुख्य बाजारपेठ, बसस्थानक परिसरात नागरिकांना दिल्या सूचना**

कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.यावेळी मुख्य बाजारपेठ, बसस्थानक परिसर तसेच गावातील विविध भागांत नागरिकांना डेंग्यूची लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय आणि स्वच्छतेचे महत्त्व याबाबत माहिती देण्यात आली. आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस पाळा, घराच्या आजूबाजूला पाणी साचू देऊ नका, मच्छरदाणीचा वापर करा अशा संदेशांद्वारे नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली.ताप, अंगदुखी, डोकेदुखी, अशक्तपणा यांसारखी लक्षणे आढळल्यास तात्काळ आरोग्य केंद्रात तपासणी करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले. तसेच प्रत्येक शनिवारी घरातील कुलर, टाक्या, ड्रम, फुलदाण्या तसेच इतर पाणीसाठे रिकामे करून कोरडे ठेवण्याचे मार्गदर्शन आरोग्य विभागाकडून करण्यात आले.सध्या वाढत्या उष्णतेमुळे डासजन्य आजारांचा धोका वाढण्याची शक्यता लक्षात घेता नागरिकांनी स्वच्छतेची काळजी घेऊन आरोग्य विभागाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# प्रशासनाच्या मुजोर कारभाराविरुद्ध भालगावातील घरकुल लाभार्थी पेटून उठले

**हप्ते थकवल्याने गरिबांची घरे अर्धवट ८ दिवसांत निधी न मिळाल्यास अंबड पंचायत समितीसमोर आमरण उपोषणाचा इशारा**

अंबड । प्रतिनिधी

शासनाच्या विविध घरकुल योजना मंजूर होऊनही केवळ प्रशासनाच्या नाकर्तेपणामुळे आणि ढिसाळ कारभारामुळे भालगाव ता.अंबड येथील शेकडो गरीब लाभार्थी हवालदील झाले आहेत. हक्काच्या घरासाठीचे हप्ते प्रशासनाने रोखून धरल्याने संतप्त झालेल्या लाभार्थ्यांनी आता थेट आरपारची लढाई लढण्याचा निर्णय घेतला आहे. येत्या आठ दिवसांत प्रलंबित हप्ते बँक खात्यावर जमा न झाल्यास अंबड पंचायत समितीसमोर लोकशाही मार्गाने आमरण उपोषण छेडण्याचा इशारा एका निवेदनाद्वारे गट विकास अधिकाऱ्यांना देण्यात आला आहे.

भालगाव येथील अत्यंत गरीब, गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना हक्काचा निवारा मिळावा म्हणून शासनाच्या वतीने यशवंतराव चव्हाण घरकुल योजना, रमाई आवास योजना, शबरी घरकुल योजना, प्रधानमंत्री आवास योजना आणि अहिल्याबाई होळकर घरकुल योजना अशा विविध योजनांतर्गत घरकुले मंजूर करण्यात आली. आपल्या हक्काचे पक्के घर होणार या आशेने लाभार्थ्यांनी पदरचे पैसे खर्च करून उसने-पासने आणून आणि मजुरी करून बांधकामाला सुरुवात केली. अनेकांची घरे आता अंतिम टप्प्यात आहेत तर काहींची अर्धवट अवस्थेत आहेत. मात्र हप्ते वेळेवर न मिळाल्याने गरिबांची हक्काची




घरे रखडली असून ते उघड्यावर आले आहेत.

अधिकाऱ्यांची अरेरावी लाभार्थ्यांचे नंबर थेट ब्लॅकलिस्ट मध्ये

विशेष म्हणजे हप्त्यांसाठी जेव्हा गरीब लाभार्थी संबंधित अभियंता आणि पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांकडे हेलपाटे मारतात तेव्हा त्यांना बजेट नाही निधी आल्यावर बघू अशी उडवाउडवीची आणि बेजबाबदार उत्तरे दिली जातात. अत्यंत धक्कादायक बाब म्हणजे, हक्काचा पैसा मागायला जाणाऱ्या गरीब लाभार्थ्यांचे फोन कट करणे मोबाईल बंद ठेवणे आणि थेट त्यांचे संपर्क क्रमांक ब्लॅकलिस्ट मध्ये टाकण्यापर्यंत या मुजोर अधिकाऱ्यांची मजल गेली असल्याचा गंभीर आरोप लाभार्थ्यांनी केला आहे. प्रशासनाच्या या हुकूमशाही आणि असंवेदनशील कारभारामुळे लाभार्थ्यांमध्ये तीव्र संताप उसळला आहे.

शासनाच्या योजना गरिबांना निवारा देण्यासाठी आहेत की छळण्यासाठी ? अधिकाऱ्यांच्या अशा वागणुकीमुळे शासनाच्या चांगल्या उद्देशालाच प्रशासनाने हरताळ फासला आहे.

संतप्त घरकुल लाभार्थी भालगाव.

तर होणाऱ्या परिणामांना प्रशासन जबाबदार

प्रशासनाने तात्काळ या प्रकरणात लक्ष घालून भालगावच्या सर्व पात्र लाभार्थ्यांचे प्रलंबित हप्ते त्यांच्या बँक खात्यावर वर्ग करावेत अशी आग्रही मागणी करण्यात आली आहे. येत्या ८ दिवसांत यावर सकारात्मक कारवाई न झाल्यास सर्व लाभार्थी अंबड पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसतील. या आंदोलनादरम्यान लाभार्थ्यांच्या आरोग्याला किंवा जिवाला बरे-वाईट झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित प्रशासनाची राहील असा थेट आणि सज्जड दमच या निवेदनातून देण्यात आला आहे.

या निवेदनावर शिवबा संघटना संपर्कप्रमुख संतोष मुळे, मनसे किसान सेना तालुका अध्यक्ष भगवान खंडागळे, ज्ञानेश्वर भाकरे, गजानन पुरी, उमेश कुलकर्णी, कल्याण मुळे, ऋषी इंगळे, दत्तात्रय इंगळे, महादेव खंडागळे, सुभाष जऱ्हाड, सुखदेव खंडागळे, बाळू जऱ्हाड, शिवाजी काळे यांच्यासह शेकडो घरकुल लाभार्थ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## आष्टी हद्दीत शॉर्ट सर्किटमुळे एक एकर ऊस जळाला : वाऱ्यामुळे दुर्घटना;दीड लाखांचे नुकसान



आष्टी - (एस.राजेंद्र लाड) तालुक्यातील ब्रह्मगाव येथील शेतकरी अनिता बाबासाहेब सानप यांच्या एक एकर उभ्या ऊस पिकाची शॉर्ट सर्किटमुळे झालेल्या भीषण आगीत राख झाली. हा प्रकार सोमवारी सकाळी दहा वाजताच्या सुमारास आष्टी हद्दीतील सर्वे क्रमांक २७७ मध्ये घडला. या दुर्दैवी घटनेत शेतकऱ्याचे सुमारे दीड लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. सध्या परिसरात जोराची वादळी वारे सुटली आहेत. त्यामुळे अनेक ठिकाणी विद्युत वाहक तारांचे घर्षण होत आहे. आष्टी हद्दीततील शेतशिवारात अनिता सानप यांच्या शेतालगतच्या बांधावरून गेलेल्या वीज तारा वाऱ्यामुळे आपसात घर्षणाला लागल्या. त्यातून ठिणग्या खाली पडून बांधावरील सुक्या कचऱ्याला आग लागली. त्या वेळी घटनास्थळी कोणीही नसल्याने आगीने भीषण रूप धारण केले. ही आग क्षणात अनिता सानप यांच्या उसाच्या बांधात शिरली व अवघ्या काही वेळात संपूर्ण एक एकर ऊस जळून खाक झाला.

घटनेची माहिती मिळताच तलाठी ज्ञानदेव अनारसे यांनी दुपारी घटनास्थळी भेट देत पंचनामा केला. शेतकरी अनिता सानप यांनी महावितरण कंपनीकडे तातडीने नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे. या घटनेनंतर परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, सुरक्षित विद्युत पुरवठ्यासाठी प्रशासनाने त्वरित उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे.



# खरीपपूर्व बैठकीत शेतकऱ्यांच्या प्रश्नांची थट्टा भोकरदन तालुक्यात संतापाचा उद्रेक

फक्त बैठका घेऊन फोटोसेशन नको, शेतकऱ्यांना न्याय द्या तहसीलदारांना आक्रमक निवेदन

भोकरदन इसरारखान पठाण

छत्रपती संभाजीनगर येथे पार पडलेल्या खरीप हंगामपूर्व आढावा बैठकीत शेतकऱ्यांच्या ज्वलंत प्रश्नांची अक्षरश थट्टा करण्यात आल्याचा गंभीर आरोप करत भोकरदन तालुक्यातील शेतकरी बांधवांनी प्रशासन आणि सत्ताधाऱ्यांविरोधात तीव्र संताप व्यक्त केला आहे. शेतकरी संकटात असताना बैठकीत केवळ औपचारिकता पार पाडून प्रश्नांना बगल देण्यात आली असा संतप्त सूर व्यक्त करत शेतकऱ्यांनी भोकरदन तहसील कार्यालयावर धडक देत नायब तहसीलदार पापुलवाड यांच्यामार्फत प्रशासनाला जाहीर निवेदन सादर केले.

दि. १५ मे २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या उपस्थितीत खरीप हंगामपूर्व आढावा बैठक पार पडली होती. या बैठकीत खासदार डॉ. कल्याण काळे यांनी शेतकऱ्यांच्या अनेक गंभीर आणि ज्वलंत प्रश्नांना वाचा फोडली होती. मात्र या प्रश्नांवर कोणतीही ठोस चर्चा न करता बैठक घाईघाईत आटोपल्याने संपूर्ण शेतकरी वर्गामध्ये संतापाची लाट उसळली आहे.

शेतकऱ्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की राज्यातील शेतकरी आधीच नापिकी बाजारभावातील घसरण खत-बियाण्यांच्या वाढत्या किमती आणि नैसर्गिक आपत्तीमुळे आर्थिक संकटाच्या खाईत लोटला गेला आहे. अशा परिस्थितीत शासनाने शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर ठोस निर्णय घेण्याऐवजी केवळ दिखाऊ बैठका घेऊन वेळ मारून नेण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.

# मराठीतले पहिले रहस्यमय युनिव्हर्स घबाड कुंड १९ जूनला प्रेक्षकांच्या भेटीला



आष्टी - (एस.राजेंद्र लाड) नावातच गूढता दडलेली ही कलाकृती थरार, रहस्य आणि भीतीचा अनोखा खेळ घेऊन येत आहे. घबाडकुंड ही कथा एका अशा ठिकाणाभोवती फिरते, जिथे भूतकाळातील काही न सुटलेली रहस्ये आजही जिवंत आहेत. या रहस्याशी संबंधित असलेल्या घटनांमुळे स्थानिकांमध्ये भीती आणि कुतूहल यांचे अनोखे मिश्रण निर्माण झाले आहे. मात्र, या रहस्याचा शोध घेण्यासाठी पुढे सरसावणाऱ्या काही व्यक्तिरेखा प्रेक्षकांना अनपेक्षित प्रवासावर घेऊन जातात.

घबाडकुंड चित्रपटाच्या निमित्ताने मराठीत पहिल्यांदाच साकारत असलेल्या युनिव्हर्समुळे हा चित्रपट जबरदस्त सिनेमॅटिक अनुभव ठरणार आहे. एक भव्य आणि रहस्यमय युनिव्हर्स मोठ्या पडद्यावर साकारण्याचा हा धाडसी प्रयत्न दिग्दर्शक प्रितम एस. के. पाटील यांनी केला आहे.

या अभिनव संकल्पनेला आयकॉन दी स्टाईल संस्थेचे निर्माते डॉ. रसिक कदम यांची भक्कम साथ लाभली आहे. घबाडकुंड हा भव्य चित्रपट येत्या १९ जूनला प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी सज्ज होत आहे, अशी माहिती चित्रपटाचे निर्माते डॉ. रसिक कदम यांनी अहिल्यानगर येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली. यावेळी त्यांच्या समवेत दिग्दर्शक प्रितम एस. के. पाटील, अभिनेता देवदत्त नागे, संदीप पाठक, वैष्णवी कल्याणकर, स्मिता पायगुडे, साहिल अनलदेवर इत्यादी कलावंत उपस्थित होते.

आयुष्यात अनपेक्षित घटनांनी काहींच्या स्वप्नांना पंख फुटतात, पण त्याचवेळी पडद्यामागे सुरू असतो संशय आणि संकटांचा भयानक खेळ. भीती आणि अनिश्चिततेच्या छायेत घडणाऱ्या अकल्पित घटनांमुळे कथानक प्रत्येक टप्प्यावर नवे प्रश्न उभे करते. सत्याच्या शोधात निघालेल्यांना कोणत्या गोष्टीला सामोरे जावे लागते? आणि शेवटी नशिब जिंकतं की माणूस? याची उत्कंठा वाढविणारा घबाडकुंड हा भव्य चित्रपट आहे. या चित्रपटात शशांक शेंडे, संदीप पाठक, देवदत्त नागे, कुशल बद्रिके, प्राजक्ता हनमघर, स्मिता पायगुडे-अंजुटे, वैष्णवी कल्याणकर, रॉकी देशमुख, आरोही भोईर, योगेश प्रकाश तनपुरे, साहिल अनलदेवर आदि कलाकारांची दमदार फौज घबाडकुंड चित्रपटात आहे.

दिग्दर्शकाने कथानकाची मांडणी अत्यंत प्रभावी पद्धतीने करत प्रेक्षकांना शेवटपर्यंत खिळवून ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. उत्कृष्ट छायांकन, पार्श्वसंगीत आणि दमदार अभिनय यामुळे घबाडकुंड चा अनुभव अधिक रोमांचक होणार आहे. थरार आणि रहस्य आवडणाऱ्या प्रेक्षकांसाठी घबाडकुंड ही एक पर्वणी ठरणार आहे. हा चित्रपट मराठीसह दाक्षिणात्य भाषांमध्ये सुद्धा चित्रपट प्रदर्शित होणार आहे.

चित्रपटाचे लेखन संजय नवगिरे, अक्षय धरमपाल यांचे आहे. गीतकार नयूम पठाण आहेत. कलादिग्दर्शन योगेश इंगळे, छायांकन योगेश कोळी तर संकलन सौमित्र धाराशिवकर यांचे आहे. साऊथचे प्रसिद्ध फाईट मास्टर कार्तिक यांनी या चित्रपटासाठी बॅकग्राउंड म्युझिकची जबाबदारी अभिनय जगताप यांनी सांभाळली आहे. रि-रेकॉर्डिंग मिक्सर सुजित शिनगारे व साउंड डिझाइन मानव श्रोत्रिय (एमपीएससी) यांचे आहे. प्रोडक्शन मॅनेजर विष्णु घोरपडे आहेत. हा चित्रपट सर्वांनी चित्रपट गृहातच जाऊन पहावा असे आवाहन घबाड कुंड च्या टीमने यावेळी केले.

# प्रतिकूल परिस्थितीवर मात करत सार्थक काळेचे घवघवीत यश

## एसएससी परीक्षेत ८८.४० टक्के गुण; संस्कृतमध्ये ९३ तर सामाजिक शास्त्रात ९२ गुणांची चमकदार कामगिरी

जालना । प्रतिनिधी



जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर यशाला गवसणी घालत सार्थक गजानन काळे यांनी एसएससी बोर्ड परीक्षेत ८८.४० टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. जालना येथील किड्स कॅम्ब्रीज स्कूलचा विद्यार्थी असलेल्या सार्थकने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेत हे यश मिळवले असून सर्व स्तरातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

सार्थकने विशेषतः संस्कृत विषयात ९३ गुण तर सामाजिक शास्त्र विषयात ९२ गुण मिळवत आपल्या गुणवत्तेची छाप उमटवली. अभ्यासातील सातत्य, कष्ट आणि सकारात्मक दृष्टिकोनाच्या बळावर त्याने हे यश मिळवले असल्याची भावना शिक्षक व नातेवाईकांनी व्यक्त केली.

या उल्लेखनीय यशाबद्दल नारायण गावंडे, इंजि. गोपाल पवार, डॉ. शंकर तिकांडे, जाधव सर, कचोर सर, मारोती शेळके, सुनिल गांगे, गजानन डोंगरे, शिरसाट तसेच ओजस गणपती कॉलनी मित्र मंडळ यांच्या वतीने सार्थक काळे यांचे अभिनंदन करण्यात आले. तसेच पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देत भविष्यातही असेच यश संपादन करावे, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# निकळक येथे डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अभ्यासिका व सार्वजनिक वाचनालयाचे जल्लोषात उद्घाटन

गावागावात अभ्यासिका वाचनालय आणि व्यायामशाळा उभारणार- भाऊसाहेब घुगे

बदनापूर । प्रतिनिधी



तालुक्यातील निकळक गावात उभारण्यात आलेल्या डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अभ्यासिका व सार्वजनिक वाचनालयाचे उद्घाटन अत्यंत उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाले. जालना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कृष्णकांत कनवारिया यांच्या शुभहस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.उद्घाटन सोहळ्याला विद्यार्थी, युवक, ग्रामस्थ आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभल्याने परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

कार्यक्रमात बोलताना भाऊसाहेब घुगे यांनी बदनापूर तालुक्यातील प्रत्येक गावात अभ्यासिका, सार्वजनिक वाचनालय आणि व्यायामशाळा उभारण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील अशी ग्वाही दिली. निकळक येथील अभ्यासिका व वाचनालयासाठी नाथ फाउंडेशनच्या माध्यमातून आर्थिक सहकार्य करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

युवकांमध्ये वाढत असलेली शिक्षणाची ओढ, स्पर्धा परीक्षांप्रती असलेली तळमळ आणि जिद्द पाहून या अभ्यासिकेतून दरवर्षी अनेक विद्यार्थी शासकीय सेवेत यश संपादन करतील असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

यावेळी मार्गदर्शन करताना मुख्य कार्यकारी अधिकारी कृष्णकांत कनवारिया यांनी आपल्या स्पर्धा परीक्षा तयारीचा प्रेरणादायी प्रवास विद्यार्थ्यांसमोर उलगडला. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत आयएएस पदापर्यंत पोहोचण्याचा संघर्षमय प्रवास त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितला. परिस्थिती कितीही कठीण असली तरी मेहनत सातत्य आणि आत्मविश्वासाच्या जोरावर यश निश्चित मिळते असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.कार्यक्रमात बदनापूर पोलीस स्टेशनचे पीआय टी. एम. सुराशे यांनीही विद्यार्थ्यांशी संवाद साधत अभ्यासाबरोबरच शारीरिक तंदुरुस्तीचे महत्त्व अधोरेखित केले.यशस्वी होण्यासाठी जिद्द, चिकाटी आणि निरोगी शरीर आवश्यक आहे असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांचे मनोबल वाढविले.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून बद्री पठाडे, परमेश्वर नाईकवाडे, धर्मराज गुंडे, भगवान सावंत, राव पटेल, शेख मुनीर यांच्यासह विविध गावांचे सरपंच, पोलीस अधिकारी, शिक्षक, ग्रामपंचायत सदस्य, सामाजिक कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.तसेच उपसभापती संजय जगदाळे, गटशिक्षणाधिकारी गजानन वाळके, ग्रामसेवक विष्णू चापाईतकर, मुख्याध्यापक फुलचंद पिंपराळे, शिक्षक श्री मुंडे व श्री मस्के यांचीही विशेष उपस्थिती होती.

दरम्यान, या अभ्यासिका व वाचनालयाच्या उभारणीसाठी वाचनालय समितीच्या युवकांनी घेतलेल्या परिश्रमांचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात आले. गावातील युवकांनी एकत्र येत उभारलेले हे ज्ञानमंदिर भविष्यात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्थान ठरणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# कर्तव्यावर जाण्यापूर्वी काळाचा घाला; सीआरपीएफ जवान विष्णू पोपट शेळके यांचा दुर्दैवी मृत्यू

धानोरा येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार



आष्टी - (एस.राजेंद्र लाड) देशसेवेचे कर्तव्य पार पाडण्यासाठी पुन्हा रुजू होण्याची तयारी सुरू असतानाच काळाने घाला घातल्याने केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या (सीआरपीएफ) जवानाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना आष्टी तालुक्यातील धानोरा येथे घडली. मध्य प्रदेशातील भोपाळ येथे कार्यरत असलेले सीआरपीएफ जवान विष्णू पोपट शेळके हे सुट्टी संपवून पुन्हा सेवेत रुजू होणार होते. मात्र, भरधाव छोटा हत्ती टेम्पोच्या भीषण धडकेत गंभीर जखमी झाल्यानंतर उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. या घटनेमुळे धानोरा गावासह संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत असून सर्वत्र शोककळा पसरली आहे.

रविवार दि. १७ मे रोजी सकाळी सुमारे ११ वाजण्याच्या दरम्यान बीड-अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावरील धानोरा येथील संतोषी माता चौकाजवळ हा भीषण अपघात झाला. मिळालेल्या माहितीनुसार, जवान विष्णू शेळके हे आपल्या दुचाकीवरून (क्रमांक एमएच २३ एपी ४७९५) महामार्गावरील डिव्हायडरवरून वळण घेत होते. त्याचवेळी जामखेडकडून पुण्याच्या दिशेने भरधाव वेगाने येणाऱ्या छोटा हत्ती टेम्पोने (क्रमांक एमएच १२ एसएक्स ८४३३) त्यांच्या दुचाकीला समोरासमोर जोरदार धडक दिली. या भीषण धडकेत विष्णू शेळके गंभीर जखमी झाले. अपघातानंतर परिसरातील नागरिकांनी तत्काळ धाव घेत त्यांना उपचारासाठी अहिल्यानगर येथील रुग्णालयात दाखल केले. मात्र, त्यांची प्रकृती अत्यंत चिंताजनक असल्याने डॉक्टरांनी शर्थीचे प्रयत्न करूनही उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

देशसेवेसाठी समर्पित असलेला एक कर्तव्यदक्ष जवान अचानक काळाच्या पडद्याआड गेल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. सोमवार दि. १८ मे रोजी सकाळी धानोरा येथे शासकीय इतमामात जवान विष्णू पोपट शेळके यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी पोलीस प्रशासनासह सीआरपीएफच्या पुणे येथील पथकाने उपस्थित राहून आपल्या शूर सहकाऱ्याला मानवंदना दिली. हवेत बंदुकीच्या फैरी झाडून त्यांना अखेरची सलामी देण्यात आली. अंत्यसंस्कारावेळी गावकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून अश्रूपूर्ण वातावरणात आपल्या लाडक्या सुपुत्राला निरोप दिला.

अत्यंत शांत, कर्तव्यनिष्ठ आणि मिळून मिसळून वावरणारे व्यक्तिमत्त्व म्हणून विष्णू शेळके यांची परिसरात ओळख होती. देशसेवेची शपथ घेत सीमावर्ती भागात जबाबदारी पार पाडणारा जवान कायमचा निघून गेल्याने कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी आणि दोन मुली असा परिवार आहे. जवान विष्णू शेळके यांच्या निधनामुळे धानोरा गावाने एक कर्तव्यदक्ष सुपुत्र गमावला असल्याची भावना ग्रामस्थांमधून व्यक्त होत आहे.

# जाफराबाद-भोकरदन रस्त्यावरील गतिरोधक ठरला मृत्यूचा सापळा निष्पाप महिलेचा बळी

## रिफ्लेक्टर आणि पांढऱ्या पट्ट्यांचा अभाव सार्वजनिक बांधकाम विभागाच्या धृतराष्ट्र भूमिकेमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप



भोकरदन- जाफराबाद इसरारखान पठाण :-

प्रशासकीय अनास्था आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ढिसाळ कारभाराचा आणखी एक बळी गेला आहे. जाफराबाद-भोकरदन मार्गावरील नर्मदा पॅलेसजवळ असलेल्या जीवघेण्या गतिरोधकामुळे झालेल्या भीषण अपघातात एका ४० वर्षीय महिलेला आपला जीव गमवावा लागला आहे. लक्ष्मी एकनाथ कांबळे टेलर वय ४० रा. ब्रम्हपुरी ता.जाफराबाद असे मृत महिलेचे नाव आहे.अत्यंत गरिबीत दिवस काढणाऱ्या कांबळे कुटुंबातील कर्त्या महिलेचा असा दुर्दैवी अंत झाल्याने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत असून संतप्त नागरिकांनी प्रशासनाला धारेवर धरले आहे.

अंधारातील तो गतिरोधक... अन् कोसळला दुःखाचा डोंगर

मिळालेल्या माहितीनुसार रविवार दि. १७ मे रोजी रात्री ९ वाजेच्या सुमारास हा अपघात घडला. जाफराबाद-भोकरदन रस्त्यावरून दुचाकी जात असताना रात्रीच्या अंधारात चालकाला रस्त्यावरील गतिरोधकाचा अंदाज आला नाही. गतिरोधकावर कोणतेही पांढरे पट्टे किंवा रिफ्लेक्टर नसल्याने दुचाकी थेट गतिरोधकावरून हवेत उडाली. या भीषण धक्क्याने दुचाकीच्या मागे बसलेल्या लक्ष्मी कांबळे या रस्त्यावर जोरात कोसळल्या. त्यांच्या डोक्याला व शरीराला गंभीर दुखापत झाली. स्थानिक नागरिकांनी तातडीने धाव घेत त्यांना रुग्णालयात दाखल केले मात्र दुर्दैवाने उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. एका निष्पाप महिलेचा जीव गेल्याने कांबळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

हा अपघात नाही तर प्रशासकीय खून

संबंधित गतिरोधकावर रिफ्लेक्टर नाहीत पांढरे पट्टे नाहीत आणि साधा इशारा फलकही नाही. रात्रीच्या अंधारात हा गतिरोधक म्हणजे चालकांसाठी डेथ ट्रॅप ठरत आहे. येथे यापूर्वीही अनेक अपघात झाले वारंवार ओरड झाली पण सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी कुंभकर्णी झोपेत आहेत. या मृत्यूला पूर्णपणे सार्वजनिक बांधकाम विभागच जबाबदार आहे

संतप्त स्थानिक नागरिक

ठिकठिकाणी बेकायदेशीर गतिरोधकांचे पेव प्रशासन क्शन घेणार की आणखी बळींची वाट पाहणार ?

धक्कादायक बाब म्हणजे केवळ नर्मदा पॅलेसजवळच नाही तर देऊळगाव राजा ते जाफराबाद रोडवरील पोद्दार इंग्लिश स्कूलजवळही अशीच धोकादायक परिस्थिती निर्माण झाली आहे. येथेही गतिरोधकांवर ना पांढरे पट्टे आहेत ना रिफ्लेक्टर परिणामी या ठिकाणीही कधीही मोठा अपघात होऊन निष्पाप नागरिकांचा बळी जाण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

रस्त्यांवर मनमानी पद्धतीने बेकायदेशीर गतिरोधक टाकणाऱ्यांचे पेव फुटले असून याकडे संबंधित यंत्रणेने पूर्णपणे डोळेझाक केली आहे.

नागरिकांचे खडे सवाल आणि मागण्या

सुरक्षेच्या मूलभूत नियमांचे उल्लंघन करून नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जबाबदार अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल होणार का ?

बेकायदेशीर गतिरोधकांवर कारवाई कधी ? रस्त्यावर अनधिकृतपणे गतिरोधक निर्माण करणाऱ्यांवर प्रशासन कधी क्शन घेणार ?

तातडीने उपाययोजना करा जाफराबाद-भोकरदन आणि देऊळगाव राजा ते जाफराबाद मार्गावरील सर्व गतिरोधकांवर २४ तासांच्या आत पांढरे पट्टे ओढावेत रिफ्लेक्टर आणि इशारा फलक लावावेत अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा जनतेने दिला आहे.

एका गरीब कुटुंबातील महिलेचा बळी गेल्यावर तरी या सुस्त प्रशासनाला जाग येणार की अधिकारी आणखी एखाद्या मोठ्या दुर्घटनेची वाट पाहत आहेत ? असा संतप्त सवाल आता जाफराबाद-भोकरदनच्या जनतेकडून विचारला जात आहे.

# मंत्री आले बैठक झाली... पण शेतकऱ्यांच्या जखमांवर फक्त मीठ चोळलं

## खरीप बैठकीत बळीराजाच्या प्रश्नांना बगल जाफ्राबादमध्ये संतापलेल्या शेतकऱ्यांचा तहसीलवर धडक मोर्चा



जालना । प्रतिनिधी

खरीप हंगाम तोंडावर आलेला असताना बियाणे, खते, हमीभाव, पीकविमा आणि कांदा उत्पादकांच्या ज्वलंत प्रश्नांवर शासनाकडून ठोस निर्णयाची अपेक्षा बाळगून असलेल्या जाफ्राबाद तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पदरी केवळ घोर निराशा पडली आहे. राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्या उपस्थितीत १५ मे रोजी पार पडलेली खरीप नियोजन बैठक म्हणजे केवळ एक औपचारिकता ठरली असा थेट आरोप करत संतप्त शेतकऱ्यांनी दि. १८ मे रोजी थेट तहसील कार्यालयावर धडक मोर्चा काढला आणि तहसीलदारांना लेखी निवेदन सादर करत प्रशासनाला जाब विचारला.

बैठक घाईघाईत आटोपली लोकप्रतिनिधींच्याही प्रश्नांना केराची टोपली

जाफ्राबाद तालुक्यातील शेतकऱ्यांनी अत्यंत आक्रमक शब्दांत आपली नाराजी व्यक्त केली आहे. खरीप हंगाम उंबरठ्यावर असताना खत-बियाण्यांचा तुटवडा गगनाला भिडलेले दर बाजारातील घसरलेले भाव पीक विमा कंपन्यांची मनमानी आणि बोगस कृषी निविष्ठांचा सुळसुळाट यावर या बैठकीत निर्णायक तोडगा निघेल अशी आशा शेतकऱ्यांना होती.

या बैठकीत खासदार कल्याण काळे यांनी देखील हमीभाव खरेदी केंद्र सुरू ठेवणे व्यापाऱ्यांकडून शेतमालाची होणारी लूट कांदा उत्पादकांचे प्रचंड नुकसान सोयाबीन-कापूस उत्पादकांच्या अडचणी आणि खत-बियाण्यांच्या वाढलेल्या किमती यांसारखे गंभीर प्रश्न उपस्थित केले. मात्र त्यांनाही पूर्ण वेळ न देता ही बैठक अत्यंत घाईघाईत आटोपून शेतकऱ्यांच्या प्रश्नांना थेट बगल देण्यात आली. यामुळे उपस्थित शेतकऱ्यांमध्ये संतापाची तीव्र लाट उसळली.

मंत्री आले म्हणून आम्हाला मोठी आशा होती की आमच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर काहीतरी ठोस निर्णय होतील. पण या सरकारी बैठकीत शेतकऱ्यांना बोलायलाच वेळ दिला नाही खत-बियाण्यांचे दर दुप्पट झालेत कांद्याला उत्पादन खर्चही निघत नाही आणि हमीभाव कागदावरच आहे. मग अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी जगायचं कसं ?

सुरेश गवळी शेतकरी नेते

मराठवाड्यातील बळीराजा आधीच होरपळलेला

मराठवाड्यातील शेतकरी आधीच निसर्गाच्या अवकृपेने उद्ध्वस्त झाला आहे. कधी कमी पाऊस तर कधी अस्मानी संकट वाढता उत्पादन खर्च कर्जाचा डोंगर आणि बाजारातील कमालीची अस्थिरता यामुळे शेतकरी आर्थिक गर्तेत सापडला आहे. अशा परिस्थितीत ही खरीप नियोजन बैठक म्हणजे शासनापर्यंत थेट आवाज पोहोचवण्याची मोठी संधी होती. मात्र यंदा तीच बैठक शेतकऱ्यांच्या तीव्र रोषाचा केंद्रबिंदू ठरली आहे.

हजारो शेतकऱ्यांच्या सह्यांनी प्रशासनाचे धाबे दणाणले!

हे निवेदन तहसीलदारांमार्फत राज्याचे कृषी मंत्री जालना जिल्हाधिकारी आणि जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्याकडे पाठवण्याची आग्रही मागणी करण्यात आली आहे. या निवेदनावर शेतकरी नेते सुरेश दामोदर गवळी, रोहन झुले, गजेंद्र भुजबळ, अखिल शंकर ठाकरे, साहिद शेख, नालिद खान पठाण यांच्यासह जाफ्राबाद तालुक्यातील हजारो त्रस्त शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

थोडक्यात पार्श्वभूमी

गेल्या काही वर्षांपासून मराठवाड्यातील शेतकरी संकटाच्या दुष्टचक्रात अडकला आहे. उत्पादन खर्च दुप्पट होत असताना बाजारभाव मात्र मातीमोल होत आहेत. त्यात हवामानाचा लहरीपणा आणि विमा कंपन्यांची उघड दरोडेखोरी यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. त्यातच आता खरीप नियोजन बैठकीत लोकप्रतिनिधी आणि मंत्र्यांनी दाखवलेल्या या उदासीनतेमुळे प्रशासनानेच शेतकऱ्यांच्या आशेवर पाणी फेरल्याची भावना निर्माण झाली असून येत्या काळात हा संघर्ष तीव्र होण्याची चिन्हे आहेत.

# रेणापूर सुधा प्रकल्पग्रस्त शेतकरी जमिनीच्या प्रलंबित मावेजासाठी पुन्हा एकदा आंदोलनाच्या पावित्र्यात

भोकर तालुका प्रतिनिधी साईनाथ बंडोड

आज दि.१८ मे रोजी पासून भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी भोकर यांच्या कार्यालयासमोर करत आहेत अमरण उपोषण ! भोकर तालुक्यातील रेणापूर सुधा बृ.ल.पा.तलाव प्रकल्पाची १.१० मीटर उंची वाढविण्याच्या कामासाठी ६ गावच्या शेतकऱ्यांची ३७.०७ हेक्टर अतिरिक्त जमिन भुसंपादित करण्यात आली.मुल्यमापनानुसर निश्चित केलेली एकूण रक्कम न देता सदरील भुसंपादित जमिन प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या ७/१२ वरुन कमी करण्यात आली.परंतू अद्यापही ७० टक्के प्रलंबित मावेजाची रक्कम प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना देण्यात आली नाही. तसेच प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना शेताकडे जाण्यासाठीचा रस्ता व पुल ही बांधून देण्यात आला नाही.त्यामुळे प्रलंबित एकूण मावेजा त्वरीत द्यावा व रस्ता आणि पुल बांधून द्यावा यांसह आदी मागण्यांसाठी प्रकल्पग्रस्त शेतकरी पुन्हा एकदा आंदोलनाच्या पावित्र्यात असून दि.१८ मे २०२६ रोजी पासून भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी भोकर यांच्या कार्यालयासमोर अमरण उपोषण करत आहेत.

रेणापूर सुधा बृ.ल.पा.तलाव प्रकल्प ता.भोकर ची १.१० मीटर उंची वाढवण्यासाठी मौ.बोरगाव,किन्हाळा, थेरबन,बटाळा,रेणापूर व सोमठाण या एकूण ६ गावच्या शेतकऱ्यांची ३७.०७ हेक्टर अतिरिक्त जमिन भुसंपादीत करण्यात आली.सदरील भुसंपादित जमिनीची मुल्यमापन मावेजा रक्कम २३ कोटी ३४ लाख रुपये निश्चित करण्यात आली.परंतू ही रक्कम प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना न देता उंची वाढविण्याचे काम मार्च २०२५ मध्ये सुरु करण्यात आले.यावेळी भुसंपादित जमिनीचा मावेजा प्रथम देण्यात यावा व नंतर काम सुरु करावे असा पावित्रा घेत प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी लोकशाही मार्गाने आंदोलन सुरू केले होते.तसेच आपल्या न्याय हक्काच्या मागण्यांसाठी दि.९ जून २०२६ रोजी भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी भोकर यांच्या कार्यालयासमोर कार्यकारी अभियंता, विष्णूपुरी प्रकल्प विभाग क्रं.-२,जि.नांदेड यांच्या विरोधात अमरण उपोषण सुरु केले होते.यावेळी एकूण मावेजापैकी ३० टक्के रक्कम प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना देण्याबाबत आश्वासित करण्यात आले व जुलै २०२५ मध्ये ठरल्याप्रमाणे मावेजाची ७ कोटी ९७ लाख रुपये अर्थातच ३० टक्के रक्कम प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना देण्यात आली.



मावेजाची ३० टक्के रक्कम देऊन जवळपास १० महिने होत आहेत.दरम्यानच्या काळात प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी उर्वरित प्रलंबित ७० टक्के मावेजा मिळावा यासाठी भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी भोकर,कार्यकारी अभियंता,विष्णूपुरी प्रकल्प विभाग क्रं.-२,जि.नांदेड यांच्याकडे सातत्याने निवेदनाद्वारे लेखी व प्रत्यक्ष भेटून तोंडी मागणी केली. परंतू अद्यापतरी सदरील मागणीस संबंधित अधिकारी व पाटबंधारे विभाग प्रशासनाने प्रतिसाद दिलेला नाही.याच बरोबर भोकर विधानसभा मतदारसंघाच्या आमदार ड. श्रीजया अशोकराव चव्हाण यांनी पावसाळी अधिवेशन २०२५,अर्थसंकल्प अधिवेशन मार्च २०२६ मध्ये उपरोक्त प्रलंबित मावेजाविषयी मागणी केली.तसेच माजी मुख्यमंत्री खासदार अशोकराव चव्हाण व आमदार ड. श्रीजया अशोकराव चव्हाण यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासमवेत दि.५ मार्च रोजी बैठक घेऊन व पत्रव्यवहार करून उपरोक्त विषयी मागणी केली.जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी अधिवेशनात या प्रकल्पाचे काम दोन महिन्यांत पुर्ण करु व प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना १५ कोटी ३७ लाख रुपये अर्थातच उर्वरित प्रलंबित ७० टक्के मावेजाची रक्कम देऊ असे आश्वासित केले.परंतू अद्यापही तो मावेजा देण्यात आला नाही.

सदरील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना प्रलंबित एकूण मावेजा न देता अतिरिक्त भुसंपादित जमिन त्यांच्या ७/१२ वरुन कमी करण्यात आली आहे.वास्तविक पाहता एकूण मावेजा दिल्याशिवाय ही जमिन ७/१२ वरुन कमी करता येत नाही.परंतू ती कमी करण्यात आल्याने संबंधित अधिकारी व पाटबंधारे विभागाने ही अक्षम्य चूक केली असून प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांची ही घोर फसवणूक आहे. याबाबद वेळ प्रसंगी सदरील शेतकरी मा.न्यायालयात न्याय दाद मागणार आहेत.तसेच काही शेतकरी भुमिहिन,तर काही अल्पभूधारक व काही अत्यल्प भुधारक झाले आहेत.खरीप पेरणी हंगाम तोंडावर आला असून प्रलंबित मावेजा न मिळाल्याने हे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले असून खरीप पेरणी होईल किंवा नाही ? या चिंतेत आहेत.तर काही शेतकऱ्यांच्या मुला मुलींचे विवाह सोहळे खोळंबली असून ते सामाजिक तथा कौटुंबिक संकटात सापडले आहेत.याच बरोबर प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या शेताकडे जाणारा रस्ते पाण्याखाली गेली असल्याने त्यांना माघील वर्षीच्या खरीप हंगामात पेरणीसाठी शेताकडे जाता येऊ शकले नाही.त्यामुळे या शेतकऱ्यांना मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागले आहे.माघील वर्षी कार्यकारी अभियंता,विष्णूपुरी प्रकल्प विभाग क्रं.-२,जि.नांदेड यांनी सदरील रस्ता व पुल लवकरच उपलब्ध करुन देऊ म्हणून लेखी आश्वासित केले होते.परंतू अद्यापही त्यांनी हे केले नसल्याने यावर्षी देखील सदरील शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक संकटास सामोरे जावे लागणार आहे. म्हणून सदरील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी प्रलंबित ७० टक्के मावेजा त्वरित द्यावा व रस्ता आणि पुल उपलब्ध करून देण्यात यावा यांसह आदी मागण्यांसाठी पुन्हा एकदा लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा पावित्रा घेतला असून कार्यकारी अभियंता विष्णूपुरी प्रकल्प विभाग क्रं.-२,जि.नांदेड व संबंधित प्रशासनाविरुद्ध सोमवार,दि.१८ मे २०२६ रोजी पासून भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी भोकर यांच्या कार्यालयासमोर अमरण उपोषण करणार आहेत.सर्व प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या वतीने प्रातिनिधिक स्वरूपात नईमोद्दीन हमीदमिया शेख,बालाजी गणपत वनलवाड,प्रशांत श्रीराम शिवेवार,मोहमद रेहान अब्दुल अजीज कुरेशी,मारोती चांदू देवकर,यांसह आदी शेतकऱ्यांचा उपोषणकर्त्यांत समावेश राहणार आहे. उपरोक्त मागण्या त्वरीत मंजूर कराव्यात.तसेच या उपोषणा दरम्यान उपोषणकर्ते व प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या शरिरास इजा किंवा जिवित्वास काही हाणी तथा नुकसान झाल्यास याची संपुर्ण जबाबदारी भुसंपादन अधिकारी,कार्यकारी अभियंता विष्णूपुरी प्रकल्प विभाग क्रं.-२,जि.नांदेड व संबंधित प्रशासनावर राहील असा इशारा देण्यात आला आहे.तसेच सदरील उपोषण आंदोलनाविषयी सर्व संबंधितांना निवेदन देण्यात आले असून निवेदनावर प्रकल्पग्रस्त शेतकरी उत्तम बाबळे,तानाजी शिवेवार, गणपत चिल्लेवार,प्रशांत शिवेवार,अ.रहिम अ.करीम, शेख नईमोद्दीन हमिदमियां,गोदावरीबाई नाईकवाडे,दत्ता नवटक्के,मारोती देवकर,माधव देवकर,दिलीप सुर्यवंशी, शिवाजी हुबेवाड,समीउल्ला बेग अ.बेग,बालाजी वनलवाड,सुरेश आरकलवाड,नारायण आरकलवाड यांसह आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## तालयज्ञ २०२६ कार्यशाळेतून लय-तालाचे संस्कार ; नांदेडमध्ये तबला-पखवाज साधनेची अनोखी पर्वणी

नांदेड ।प्रतिनिधी

नांदेड येथे आयोजित करण्यात आलेल्या ‘तालयज्ञ २०२६’ या तबला-पखवाज कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. तालयोगी तबला विद्यालयाचे संचालक व प्रख्यात तबलावादक प्रशांत गाजरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या तीन दिवसीय कार्यशाळेत नांदेड, परभणी व लातूर येथील सुमारे ४० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.




तबलावादनातील लय, ताल, गणित, व्याकरण आणि रियाज यांचा सखोल अभ्यास विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष सरावातून करून घेण्यात आला. प्रारंभिक स्तरावरील विद्यार्थ्यांपासून ते अलंकारपर्यंतचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना एकत्रितपणे शिकविताना प्रशांत गाजरे यांनी दाखविलेली तळमळ आणि समर्पण उपस्थितांच्या मनाला भिडणारे ठरले.

कार्यशाळेत कायदा, रेला, तिहाई, दिव्य संकीर्ण, तिश्र जाती, चतुःश्र जाती, निकास, बल यांसारख्या तबल्यातील विविध पैलूंवर मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांकडून तासनतास अक्षरांचा रियाज, लयकारीचे गणित आणि समेवर येण्याचे प्रत्यक्षिक करून घेताना निर्माण होणारा रोमांचक अनुभव सर्वांसाठी संस्मरणीय ठरला.

तबल्याचे गणित आणि व्याकरण हाच त्याचा आत्मा असून तो विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे हा कार्यशाळेचा मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. तबला, पखवाज आणि कथ्थक नृत्य या तिन्ही कलांचा सुंदर संगम या कार्यशाळेत अनुभवायला मिळाला.

संगीत ही गुरु-शिष्य परंपरेतून हृदयातून हृदयात पोहोचणारी विद्या असून त्यासाठी दोघांचेही समर्पण महत्त्वाचे असते, असा सूर मान्यवरांनी व्यक्त केला. या उपक्रमामुळे तबल्याचा प्रचार-प्रसार निश्चितच वाढेल, असा विश्वासही व्यक्त करण्यात आला.

कार्यशाळेदरम्यान पं. संजय जोशी, सुरमणी प्रा. धनंजय जोशी, प्रा. डॉ. जगदीश देशमुख, अभिजीत आपस्तंभ, गिरीश देशमुख, नाट्यकर्मी सुहास देशपांडे, चेतन पांडे व सारिका पांडे आदी मान्यवरांनी भेट देऊन विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला.

समारोप कार्यक्रमास ज्येष्ठ पत्रकार व कलावंत बाळासाहेब पांडे मांजरमकर, राहेगावकर महाराज तसेच योगेश नेरळकर व राजेश नेरळकर उपस्थित होते. त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. यावेळी पालकांचीही मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

कार्यशाळेसाठी गिरीराज मंगल कार्यालयातील वातानुकूलित हॉल, विद्यार्थ्यांच्या निवासाची व्यवस्था तसेच चहा, नाश्ता व भोजनाची उत्कृष्ट सोय उपलब्ध करून दिल्याबद्दल योगेश व राजेश नेरळकर यांचे विशेष कौतुक करण्यात आले.त्रिदिवसीय कार्यक्रमाचे संचलन व आभार प्रदर्शन लय ताल विद्यालय सिडको नांदेड चे संचालक संजय देशपांडे मुगावकर यांनी केले.

## ‘स्त्री जन्माचे स्वागत करा’ : जनजागृती कार्यशाळेला डॉ.सुधा कांकरिया यांनी मार्गदर्शन केले

अर्धापूर ।प्रतिनिधी

ग्रामीण रुग्णालयाच्या वतीने ’स्त्री जन्माचे स्वागत करा’ या कार्यक्रमात जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेस प्रमुख मार्गदर्शक म्हणून पीसीपीएनडीटी स्टेट सुपरवायजरी बोर्ड सदस्या डॉ. सुधा कांकरिया उपस्थित होत्या. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून नगराध्यक्षा सौ. वैशालीताई देशमुख, नगरसेविका सौ. डॉ.पल्लवीताई लंगडे,चेअरमन प्रवीण देशमुख, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.श्रीकांत देसाई, डॉ.उत्तमराव इंगळे,ग्रामीण रुग्णालयाच्या अधिक्षीका डॉ.विद्या झिने,डॉ.युवराज डाहाळे,डॉ.विशाल लंगडे, डॉ.आनंद शिंदे आदी सह अनेक मान्यवर उपस्थित होते.उपस्थीत मान्यवरांच्या सत्कार ग्रामीण रुग्णालयाच्या वतीने करण्यात आला.



यावेळी बोलतांना डॉ.सुधा कांकरिया म्हणाला की या चळवळीअंतर्गत ११ कलमी कार्यक्रम राबवून स्त्री जन्माचे नुसते स्वागत नको प्रत्येक घरोघरी जाऊन मानसिकता बदलण्यासाठी जनजागृती करणे गरजेचे आहे.तसेच स्त्री भ्रुण हत्या प्रतिबंध कायद्याची अंमलबजावणी व मुलगी जन्माचे स्वागत कशा पद्धतीने केले पाहिजे यासाठी प्रखरभुमीका घेण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन उपस्थितांना डॉ.सुधा कांकरिया यांनी केले आहे.यावेळी अनेक मान्यवरांची संमोचित भाषणे झाली. या कार्यशाळेस आरोग्य विभागाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांना,अंगणवाडी सेविका,आशा वर्कर्स यांच्या सह अनेकांची उपस्थिती होती.

## सारखणी येथे आज ‘नायक-कारभारी, पुजारी परिषद’ ; गोर बंजारा-लभाण समाजाच्या परंपरा जतनासाठी विचारमंथन

**परिषद सोना गार्डन येथे सकाळी ११ वाजता ; संत-महंतांचे आशीर्वाद लाभणार**

किनवट ।प्रतिनिधी

हिंदू गोर बंजारा व लभाण समाजाच्या सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरांचे संवर्धन करण्याच्या उद्देशाने किनवट येथे उद्या मंगळवारी भव्य ‘नायक-कारभारी, पुजारी परिषद’ आयोजित करण्यात आली आहे. समाजातील पारंपरिक नेतृत्व व्यवस्था, धार्मिक आचार-विचार, रूढी-परंपरा, संस्कृतीचे जतन आणि नव्या पिढीपर्यंत मूल्यांचा वारसा पोहोचविण्याच्या हेतूने ही परिषद महत्त्वपूर्ण ठरणार असल्याची भावना समाज बांधवांकडून व्यक्त केली जात आहे. सारखणी येथील सोना गार्डन येथे होणाऱ्या या परिषदेसाठी जय्यत तयारी पूर्ण करण्यात आली असून परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. जिल्ह्यासह मराठवाडा, विदर्भ आणि सीमावर्ती भागातून समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. परिषदेचे आयोजन मंगळवार, दि. १९ मे २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता सोना गार्डन, सारखणी (ता. किनवट, जि. नांदेड) येथे करण्यात आले आहे. समाजातील नायक, कारभारी, पुजारी, धर्मगुरू तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर या परिषदेत सहभागी होणार आहेत. या परिषदेला विविध पीठांचे संत, महंत आणि धर्मगुरू उपस्थित राहून समाजाला मार्गदर्शन करणार आहेत. प्रमुख उपस्थितांमध्ये प.पु. संत श्री बाबुसिंगजी महाराज पोहरादेवी (धर्मगुरू, गोर बंजारा समाज), प.पु. संत श्री सोमलिंगेश्वर महास्वामीजी (श्री शंकरलिंग गुरूपीठ, इज्यापूर, कर्नाटक), प.पु. जगद्गुरु श्री भिक्षा महाराज (पिठाध्यक्ष, हिंगलाज माता मंदिर, राजस्थान/हैदराबाद), प.पु. संत दिक्षागुरु श्री प्रेमसिंग महाराज (पैनगंगा सेवादासनगर, माहूर) प.पु. संत श्री गंगेश्वरजी महाराज (श्री महादेव संस्थान, मदनापूर) यांचा समावेश असून त्यांच्या उपस्थितीमुळे परिषदेला विशेष धार्मिक आणि सामाजिक महत्त्व प्राप्त होणार आहे. परिषदेत समाज संघटन, संस्कृती संवर्धन आणि धार्मिक जागृती या विषयांवर विशेष मार्गदर्शन करण्यात येणार आहे. यावेळी गोपाळ (केंद्रीय मंत्री, विश्व हिंदू परिषद), रामेश्वर नाईक (कक्षप्रमुख, मुख्यमंत्री सहाय्यता निधी, महाराष्ट्र राज्य), योगेश्वरजी गर्गे (देवगिरी प्रांत मंत्री, विश्व हिंदू परिषद), सिद्धेश्वर बिराजदार (धर्मजागरण प्रमुख, देवगिरी प्रांत) हे मान्यवर उपस्थित राहून समाज बांधवांना संबोधित करणार आहेत. गोर बंजारा व लभाण समाजातील नायक-कारभारी व्यवस्था ही सामाजिक सलोखा आणि परंपरा टिकवून ठेवणारी महत्वपूर्ण व्यवस्था मानली जाते. बदलत्या काळात समाजातील पारंपरिक मूल्ये, संस्कृती, धार्मिक विधी आणि सामाजिक एकात्मता अधिक मजबूत करण्यासाठी या परिषदेत विविध विषयांवर चिंतन आणि चर्चा होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. या परिषदेचे आयोजन किनवट जिल्हा हिंदू गोर बंजारा व लभाण समाज बांधव यांच्या वतीने करण्यात आले आहे. प्रशांत पुरसिंग राठोड (पालाईगुडा) हे निमंत्रक तर उल्हास थाऊ जाधव (गोकुंदा, किनवट) हे सह-निमंत्रक म्हणून कार्यभार सांभाळत आहेत. समाजातील डावसाणे, हासाबी, नसाबी तसेच सर्व समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून परिषद यशस्वी करावी, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## खासदारांचा फोन जाताच गुत्तेदार लाईनवर; रखडलेला रस्ताचे काम सुरु

अर्धापूर (प्रतिनिधी): गेल्या सहा महिन्यांपासून संथ गतीने काम झालेला व रखडलेला रस्त्यामुळे त्रस्त झालेल्या तालुक्यातील पिंपळगांव महादेव येथील ग्रामस्थांच्या संयमाचा अखेर बांध सुटला. लग्नसराईत गावकऱ्यांना आणि पाहुण्यांना मोठी कसरत करावी लागली तर इतकेच नव्हे तर एका निष्पाप बालकाला गंभीर दुखापतही झाली. मात्र ढिम्म प्रशासनाला जाग येत नसल्याचे पाहून गावकऱ्यांनी थेट वरून सुत्रे हलवली. खासदार तथा माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या दरबारात तक्रार पोहोचताच दुसऱ्याच मिनिटाला चक्र फिरली आणि रडतखडतलेल्या रस्त्याचे काम सायंकाळी सुरूवात झाली.

पिंपळगांव महादेव येथील मुख्य रस्त्याचे काम गेल्या सहा महिन्यांपासून अत्यंत संथ गतीने चालू होते. संबंधित गुत्तेदाराने रस्त्यावर गिट्टी टाकलेली काम रखडल्याने ती तशीच उघडी सोडून दिली होती. त्यामुळे संपूर्ण रस्त्याची चाळण झाली असून वाहनचालकांना अक्षरशः तारेवरची कसरत करावी लागत होती. सध्या लग्नसराईचे दिवस असल्याने गावात पाहुण्यांची मोठी वर्दळ होती. गावकऱ्यांनी गुत्तेदाराला हात जोडून विनंती केली बाबा रे लग्नकार्य आहेत रस्ता नीट कर. पण गुत्तेदाराने याकडे साफ दुर्लक्ष केले.



गुत्तेदाराच्या या मनमानीचा फटका एका पाहुण्या कुटुंबाला बसला. गावात लग्नसोहळ्यासाठी आलेल्या एका पाहुण्यांची दुचाकी या उखडलेल्या गिट्टीवरून घसरली. या भीषण अपघातात एक निष्पाप बालक गंभीर जखमी झाला. या घटनेमुळे पिंपळगांवच्या ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली. अखेर आता विनंत्या पुरे थेट कारवाई हवी असा पवित्रा गावकऱ्यांनी घेतला. ग्रामस्थांनी थेट खासदार अशोकराव चव्हाण यांची भेट घेतली. त्यांनी गुत्तेदाराच्या कारभाराचा पाढाच चव्हाणांसमोर वाचला. खासदारांनी प्रकरणाचे गांभीर्य ओळखून तात्काळ संबंधित यंत्रणेला आणि गुत्तेदाराला कडक शब्दांत सुनावले. असता ज्या रस्त्याकडे गुत्तेदार ढुंकूनही पाहत नव्हता त्याच रस्त्यावर त्याच दिवशी सायकाळी डांबर, खडी आणि मजुरांचा ताफा हजर झाला आणि काम युद्धपातळीवर सुरू झाले.

## भारतीय लहुजी सेना या सामाजिक संघटनेमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हा, रंजीत बारहाळीकर यांचे आव्हान

मुखेड ।प्रतिनिधी

मुखेड येथील शासकीय विश्राम ग्रहामध्ये भारतीय लहुजी सेना कार्यकर्ता आढवा बैठक मोठ्या उत्साहात पडली या बैठकीमध्ये नववनिर्वाचित पदाधिकारी यांची निवड करण्यात आली कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून लाभलेले मानवी हक्क अभियानाचे तुकाराम गुरुजी बारहाळीकर, यांच्या अध्यक्षतेखाली ही आढावा बैठक घेण्यात आली या बैठकीमध्ये नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार व सन्मान करण्यात आला यावेळी भारतीय लहुजी सेनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष मा. रंजीत बारहाळीकर, तसेच भारतीय लहुजी सेनेचे गणपत गायकवाङ, भारतीय लहुजी सेनेचे सल्लागार मा.प्रसराम गवाले, मराठवाडा युवा उपाध्यक्ष ,विकास अंधुरे, अमोल वाघमारे, सोशल मीडियाचे जिल्हाध्यक्ष अनिल कावडे, लहुजी सेनेचे तालुका अध्यक्ष आत्माराम गायकवाड, यां सर्वांच्या उपस्थितीमध्ये ही बैठक घेण्यात आली.



भारतीय लहुजी सेनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष रणजित बाराहळीकर, यांनी मातंग समाजाच्या जवलंत समस्यावर प्रकाश टाकत ते पुढे म्हणाले की मातंग समाजाचे अनेक प्रश्न आहेत ते सुटले पाहिजे मातंग समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे अनेक ठिकाणी मातंग समाजावर अन्याय अत्याचार होत आहेत ते थांबले पाहिजेनं जे गायरानधारक आहेत अशा लोकांचा सातबारा झाला पाहिजे असे बरेचसे काही मुद्दे आहेत जोपर्यंत आमचे प्रश्न सुटणार नाहीत तोपर्यंत आमची संघटना स्वस्त बसणार नाही असा इशाराही त्यांनी या सरकारला दिला आहे.

या कार्यक्रमाचे प्रस्ताविक पत्रकार, प्रशांत पवित्रे, यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्र संचालन ऍड प्रमोद कांबळे, यांनी केले तर या बैठकीचे आयोजन भारतीय लहुजी सेनेचे सर्व कार्यकरते यांनी केले.

## २० मेच्या औषध विक्रेता बंद दरम्यान रुग्णांची गैरसोय होऊ नये

अन्न व औषध प्रशासनाचे आवाहन

नांदेड ।प्रतिनिधी

अखिल भारतीय औषध विक्रेता संघटनेने (-खजउऊ) देशभरात तसेच राज्यात बेकायदेशीररीत्या इंटरनेट फार्मसीद्वारे होणारी ऑनलाईन औषध विक्री, ई-पोर्टल तसेच ऋड्ठ ८१७(ए) दि. २८ ऑगस्ट २०१८ आणि कोविड संदर्भातील ऋड्ठ २२०(ए) दि. २६ मार्च २०२० हे आदेश मागे घेण्याच्या मागणीसाठी २० मे रोजी एक दिवसीय देशव्यापी बंद पुकारला आहे.

या पार्श्वभूमीवर रुग्णांची गैरसोय टाळण्यासाठी नांदेड शहरासह तालुका व ग्रामीण भागातील केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनला आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. कोणत्याही रुग्णाला औषधांच्या उपलब्धतेबाबत अडचण निर्माण होऊ नये, यासाठी आवश्यक व्यवस्था ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

तसेच जिल्हा परिषदेचे जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय नांदेड, नांदेड-वाघाळा महानगरपालिका आरोग्य विभाग तसेच डॉ. शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय प्रशासनालाही त्यांच्या औषध भांडारात पुरेसा औषधसाठा उपलब्ध ठेवण्याबाबत कळविण्यात आले आहे.बंदच्या कालावधीत गरजू रुग्णांना औषधे उपलब्ध न झाल्यास अथवा अत्यावश्यक औषधांची गरज भासल्यास त्यांनी अन्न व औषध प्रशासन कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त (औषधे) अ. तु. राठोड यांच्याशी भ्रमणध्वनी क्रमांक ८३६९०२७०६८ वर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

तसेच नागरिकांनी आवश्यक औषधे आगाऊ खरेदी करून ठेवावीत, जेणेकरून संभाव्य गैरसोय टाळता येईल, असेही अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त अ.तु. राठोड यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.